बुधवार, ६ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ११६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 6 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-116 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


## चांद्रयान-३ चे प्रोपल्शन मॉड्यूल पृथ्वीच्या कक्षेत आणण्यात वैज्ञानिकांना यश

### चंद्रावर रात्र झाल्यानंतर इस्त्रोचे चंद्रावरील संशोधनकार्य थांबले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : इस्रोची चांद्रयान-३ ही मोहीम यशस्वी ठरली. चांद्रयान-३ मधील प्रज्ञान रोव्हर आणि विक्रम लँडरने चंद्रावरील तापमानापासून ते पृष्ठभागाबाबतची माहिती इस्रोला दिली. तिथे काढलेले वेगवेगळे फोटो आणि व्हिडीओदेखील इस्रोला पाठवले. परंतु, चंद्रावर रात्र झाल्यानंतर इस्रोचे चंद्रावरील संशोधनकार्य थांबले आहे. दरम्यान, चांद्रयान मोहिमेच्या उत्तरार्धात इस्रोला आणखी एक यश मिळाले आहे. चांद्रयान-३ चं प्रोपल्शन मॉड्यूल चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीच्या कक्षेत परत आणण्यात आपल्या वैज्ञानिकांना यश मिळाले आहे.**

चांद्रमोहिमेतल्या या मोठ्या टप्प्याची माहिती देताना इस्रोने म्हटले आहे की, आता चंद्रावरून पृथ्वीवर परतण्याची प्रक्रिया सोपी असणार आहे. आम्ही आता अशा प्रकारच्या मोहिमांवर काम करत आहोत. यासाठी एक सॉफ्टवेअर तयार केले जात आहे. चांद्रयान मोहीम पूर्ण करून चांद्रयान-३ चे प्रोपल्शन मॉड्यूल आता पृथ्वीच्या कक्षेत परतले आहे. हे केवळ चांद्रयान मोहिमेसाठीचे मर्यादित यश नव्हे तर कोणतेही यान अथवा अंतराळवीरास अवकाश मोहीम पर्ण करून पृथ्वीवर परत आणण्याची क्षमता सिद्ध करणारी कामगिरी आहे. त्यामुळे इस्रोला आता अंतराळात किंवा चंद्रावर अंतराळवीरास पाठवून सुखरूप परत पृथ्वीवर आणणे शक्य होईल. चांद्रयान-३ चे प्रोपल्शन मॉड्यूल सध्या पृथ्वीची प्रदक्षिणा घालत आहे. २२ नोव्हेंबर रोजी त्याने १.५४ लाख किलोमीटर अंतर पार केले. प्रोपल्शन मॉड्यूलच्या उर्वरित प्रवासास १३ दिवस लागू शकतात. प्रोपल्शन मॉड्यूल चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. आता या मॉड्यूलचा पृथ्वीपर्यंतचा प्रवास तुलनेने सोपा असेल. या मॉड्यूलसाठी एक सॉफ्टवेअर तयार केले जात आहे. जे सध्या सुरुवातीच्या टप्प्यात आहे. इस्रोने ऑगस्ट २०२३ मध्ये जगाला हेवा वाटेल अशी कामगिरी केली. इस्रोने १४ जुलै २०२३ रोजी श्रीहरीकोटा येथून लाँच केलेलं चांद्रयान ३ हे अंतराळयान २३ ऑगस्ट २०२३ रोजी यशस्वीरित्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवलं. याद्वारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत हा जगातला पहिलाच देश ठरला. त्यानंतर तब्बल




१४ दिवस चांद्रयान-३ हे चंद्रावर संशोधन करत होते. प्रज्ञान रोव्हर आणि विक्रम लँडर भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला चंद्रावरील वेगवेगळी माहिती, फोटो आणि व्हिडीओ पाठवत होते. परंतु, चंद्रावर रात्र झाल्यानंतर भारताचे प्रज्ञान आणि विक्रम निष्क्रिय झाले. कारण ही मोहीम पूर्णपणे सौरऊर्जेवर अवलंबून होती.

### चर्चेतली बातमी

## ‘इंडिया’ आघाडीची बैठक पुढे ढकलली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ६ डिसेंबरला दिल्लीत ‘इंडिया’ आघाडीची बैठक बोलावण्यात आली होती. पण, ही बैठक पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के स्टॅलिन, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव बैठकीला उपस्थित राहू शकणार नाहीत. त्यामुळे बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. एम. के स्टॅलिन तामिळनाडूत आलेल्या मिचौंक चक्रीवादळामुळे प्रवास करू शकणार नाहीत. नितीश कुमार यांची प्रकृती ठिक नाही. तसेच, ममता बॅनर्जी आणि अखिलेश यादव यांनी नियोजित कार्यक्रमांमुळे उपस्थित राहू शकणार नाहीत. त्यामुळे बैठक पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इंडिया आघाडीतील मित्रपक्षांशी चर्चा करून बैठकीचे आयोजन करण्याचा काँग्रेस पुन्हा प्रयत्न करणार आहे.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे बैठकीला उपस्थित राहणार होते. पण, आत ठाकरेंनी विमानचे तिकीट रद्द केले आहे. तर, आम आदमी पक्षाकडून अद्याप कुठलीही माहिती देण्यात आली नाही. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमधील पराभवानंतर लोकसभेच्या निवडणुकीच्या दृष्टीकोणातून काँग्रेसने ६ डिसेंबरला दिल्लीत इंडिया आघाडीच्या बैठकीचं आयोजन केले होते. या बैठकीत पुढील रणनिती आणि लोकसभेच्या संभाव्य जागावाटपावर चर्चा होण्याची शक्यता होती.

## जरांगे पाटलांच्या मार्गावर शिंपडले गोमूत्र

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** वाशीम येथील जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी मनोज जरांगे



पातूरमार्गे वाशीम शहरात येत असताना सकल ओबीसी समाज बांधवानी त्यांना काळे झेंडे दाखवीत, रस्त्यावर गोमूत्र शिंपडून निषेध व्यक्त केला. मनोज जरांगे हे राज्यात ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करीत आहेत. ते भाषणात नेहमीच ओबीसी नेते छगन भुजबळ व इतर नेत्यावर बोलतात त्यांना दुसरे नेते दिसत नाहीत का, असा सवाल सकल ओबीसी समाज बांधवानी केला. मनोज जरांगे पातूर – मालेगाव – मार्गे वाशीम कडे येत असताना आज दुपारी ४ ते ४:३० वाजेदरम्यान सिद्धू धाब्याजवळ “मनोज जरांगे हाय हाय, चले जाव चले जाव” अशा घोषणा देत काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी चोख पोलीस बंदोबस्तात मनोज जरांगे यांचा ताफा सभेकडे रवाना झाला. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर गोमूत्र शिंपडून निषेध व्यक्त केला.

## मोसंबी उत्पादकांचे अवकाळीमुळे गणित कोलमडले



आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील बहुतांश गावातील शेतकरी आता फळ पिकाच्या शेतीकडे वळले असुन यात सिताफळ, आंबा, डाळिंब, मोसंबी या फळाची लागवड करून फळे विक्रितही पैठणचे शेतकरी आता नावारूपास येत आहेत. परंतु गेल्या सप्ताहात आवकाळी पावसाने काढणीला आलेल्या मोसंबी फळाचे बेमोसमी पावसामुळे गणित कोलमडल्याने शेतकरी चिंतेत आहेत. आंब्याचा मोहर लागण्याचा काळ असुन त्यासाठी बहुतेक शेतकर्यानी आपल्या फळबागा ताणावर घेतल्या होत्या. डिसेंबरमध्ये आंबियाबहारसाठी थोडे थोडे पाणी दिले जाणार होते. मात्र आवकाळी पावसाचा फटका बसला आणि पिक धोक्यात येण्याची शक्यता वाढली.

आमच्या कडे मोसंबीचे जवळपास चार हजार पाचशे फळाचे झाडे असुन आवकि पावसामुळे मोसंबीच्या दरात घट झाल्यास आर्थिक नुकसान तर होईलच परंतु काही झाडे ताणावर असल्याने आवकाळी पावसामुळे केलेला खर्च वाया जातोकी काय त्यात गेल्या पंधरा दिवसापासून मोसंबीला योग्य दर मिळत नसल्याने मोसंबी सध्या झाडावरच परिपक्व झाल्याने मोसंबीचे व्यवहारही ठप्प आहेत .
**प्रा .युवराज औटे ( मोसंबी उत्पादक )**

सदर आवकाळी पावसामुळे ताणावर धरलेल्या मोसंबी बागाचा ताण सुटुन बाग नवतीवर जाण्याचा धोका आहे .तर ज्या बागावर अजुन आंबिया बहाराचा ताण आहे, तो गळण्याचा आसुन या साठी शेतकऱ्यांनी आप आपल्या मोसंबी बागेच्या परिस्थिती नुसार उपाययोजना करण्यात याव्यात . **रामेश्वर सुसे,( संचालक कृषी जगत,पैठण)**

## मश्गूल सत्तेचा अंधारात कारभार, पारंपारिक मच्छीमारांची उपासमार ?

आधुनिक केसरी न्यूज


परमेश्वर घुंगासे
पैठण : येथील जगप्रसिद्ध धरणावर तसेच संरक्षीत असलेल्या पक्षी अभयारण्य क्षेत्रात शासनाकडून तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा घाट घातला जात आहे.येथील गरीब कष्टकरी कामगार वर्ग ज्यांचा रोजचा उदरनिर्वाह याच तलावावर चालतो त्यांच्या पोटावर शासन सत्तेच्या जोरावर पाय देत असल्याचा उद्विग्न सवाल येथील कहार आणि भिल्ल समाजाच्या वतीने विचारला जातोय, मात्र विविध विभागाच्या परवानग्या देखील या प्रकल्पासाठी मिळाल्या असल्याचे वृत्त आहे.जायकवाडी च्या धरण क्षेत्रात सभोवतालच्या अनेक जिल्ह्यातील तब्बल बावीस हजार मच्छीमारांचे उदरनिर्वाह चालते, या प्रकल्पाने मासेमारीवर बंधने येतील आणि भुकेचा प्रश्न गंभीर होऊन बावीस हजार कुटुंब थेट उघड्यावर पडतील यात तिळमात्र शंका नाही! या सह अनेक विपरीत परिणाम या प्रकल्पाने होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी कहार भोई आणि भिल्ल समाजाच्या वतीने काही आठवड्यापूर्वी पैठण तहसील कार्यालयावर हजारोंच्या जनसमुदायाने मोर्चा काढला होता तरीही शासन स्तरावर मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे चित्र आहे एवढ्या गंभीर प्रश्नाबाबत शासनाने या संबंधित कुणालाही विश्वासात न घेता प्रकल्पाची माहिती अथवा परवानग्या गुपित का ठेवल्या ? असा सवाल या ठिकाणी उपस्थित होतो !
जायकवाडी धरण क्षेत्र राखीव पक्षी अभयारण्य म्हणून देखील पर्यटकांसाठी हमखास आकर्षणाचे केंद्रबिंदू राहिले आहे सौर ऊर्जा प्रकल्पाने नैसर्गिक जैव विविधतेवर गदा येण्याची शक्यता असल्याचे येथील पक्षी प्रेमी आणि पर्यावरण प्रेमींचे ठाम मत आहे !
पैठण जलाशयावर आज न्हवे तर कित्येक पिढ्यांनपिढ्या पारंपारिक मासेमारी करणाऱ्या कुटुंबाची संख्या मोठी आहे, या जनसमुदायाच्या रोजच्या उदरनिर्वाहाचे एक मात्र स्त्रोत हे पैठण जलाशय असून या ठिकाणी तरंगते सौर पॅनल बसवल्यांनतर मासेमारीसाठी कसलाही पर्याय त्यांना उरणार नसून उघड्यावर येण्याची वेळ त्यांच्यावर येईल अशी भावना या समाजात आहे. सोबतच बरेचश्या पक्षी प्रेमी आणि निसर्गप्रेमींनी विविध विभागांना कायदेशीर निवेदन देत यात नैसर्गिक जैव विविधता धोक्यात येईल, अशी चिंता व्यक्त केली आहे. पैठण तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढल्यानंतर शासनाने हवी तशी दखल याची घेतली नाही त्यामुळे आत्ता आमरण उपोषणाचा मार्ग समाज बांधवांनी अवलंबला आहे येत्या सात तारखेपासून तहसील कार्यालय नेवासा आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर पैठण येथे करण्यात येत असल्याचा इशारा सरकारला देण्यात आला.सोबतच राज्यभर पसरलेल्या कहार- भोई समजामार्फत तीव्र स्वरूपाचे आंदोलन हाती घेणार असल्याचे सांगण्यात आले . हे सर्व मार्ग अवलंबल्या नंतरही शासनाने योग्य ती कार्यवाही करून प्रकल्प स्थगित केला नाही तर संविधानिक आणि न्यायालयीन कायदेशीर लढाई साठी देखील कहार-भोई समाज सज्ज असल्याचे सांगण्यात आले.



**सरकारची भूमिका काय?** : अद्याप या विषयावर शासनाच्या वतीने कुठलेही अधिकृत भाष्य आलेले नाही मात्र या तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाला सर्व स्तरातून होणारा विरोध पाहता शासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे . प्रशासनाच्या वतीने तातडीने प्रकल्प स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात यावे व सात तारखेच्या आत लेखी स्वरूपात संबंधित संस्था ट्रस्ट कमिटी पंच यांच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात यावे, असे न झाल्यास सात तारखेला दुपारी बारा वाजता सामूहिक अमरण उपोषण करणार आहेत यामध्ये अनुचित प्रकार घडल्यास याला शासन प्रशासन सरकार जबाबदार राहील .
**प्रा . डॉ .दिलीप बिरुटे, (प्राध्यापक तथा पक्षीप्रेमी)**

पशु पक्षी, पर्यटन व मच्छिमार तसेच जैविक विविधतेवर मोठा परिणाम होणार असून शासनाने हा प्रकल्प तातडीने रद्द करण्यात यावा यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर निवेदन देण्यात आले आहे येत्या सात डिसेंबर रोजी नेवासा तहसील कार्यालय व पैठण डॉ . बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर सामूहिक मच्छिमार समाज यांच्यावतीने आमरण उपोषण करण्यात येणार आहे .
**कुंदन डिंबर, ( राज्य कोषाध्यक्ष कहार समाज संघटना )**

केंद्र आणि राज्य शासनाने गरीब आणि निष्पाप मच्छीमार बांधवांच्या पोटावर दिलेले हे अमानुष पाय आहेत योग्य वेळेत प्रकल्प रद्द झाला तर ठीक अन्यथा शासनाला समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल .
**राजेभाऊ रतन कुटारे, ( परभणी जिल्हा अध्यक्ष,कहार समाज संघटना )**







परमेश्वर घुंगासे
संपर्क क्र. 9623115496

आधुनिक केसरी

महाराष्ट्राच्या पैठण, उजनी ( बारामती ), परभणी, जालना, आणी बीड या ठिकाणांवर असलेल्या जलाशयाच्या अवतीभोवती या समाजाचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर आढळून येते, परंतु विज्ञान युगातील शिक्षणाचे महत्व, राजकीय आणी समाजिक सत्तेचे महत्व यांच्या लक्षात आले आहेत पिढ्या दर पिढ्या चालत आलेल्या या वंचित वर्गाला आत्ता मुख्य प्रवाहात येण्यासाठी शासकीय इच्छा शक्तीची सोबतच शोषितांचा आवाज शासन दरबारीं मांडणाऱ्या प्रबळ प्रतिनिधी ची आवश्यकता आहे .कहार - भोई समाज प्रामुख्याने मासेमारी व्यवसाय करत असला तरी बदलत्या काळानुसार रोजगारांच्या उपलब्धतेसाठी ते इत्यादी मार्गाचा अवलंब करताना दिसतात, दुष्काळाच्या काळात मासेमारी व्यवसाय पूर्णपणे ठप्प होतो या काळात भागीदारी तत्वावर इतरांच्या शेतात टरबूज लावणे या 3 महिन्यांच्या काळात ते आपला उदरनिर्वाह भगवत असतात.पिढ्यान पिढ्या पासून समाजाला मिळत नसणाऱ्या सेवा-सुविधा, विविध योजना बाबतची कोणत्याही प्रकारे हरकती आक्षेप न घेता, आपल्या कामावरती व कष्टा वरती आपला दृढ विश्वास ठेवून, कहार - भोई समाजाचे बांधव गेल्या अनादिकाळापासून, आपल्या पिढ्यानपिढ्याचा उदरनिर्वाह करत आहेत, मात्र आपल्याला सुद्धा आपले हक्क आणी प्रश्न मांडण्यासाठी आवाज असावा, लिखित आणी कायदेशीर प्रक्रिया आपल्याही करता याव्या हे त्यांच्या लक्षात आले आहे.शैक्षणिक मूल्ये आणी महत्व लक्षात घेत पै-पै जोडून समाजवर्ग आपली मुले शिकवण्यासाठी जिद्दी असल्याचे दिसून येते, महागड्या शिक्षण व्यवस्थेत शासकीय धोरणा मार्फत समाजवर्गाने मिळून सतत ची केलेली वसतिगृहाची मागणी असो, निर्मनुष्य ठिकाणी जीव मुठीत घेऊन राहण्याची वेळ येऊ नये म्हणून घरकुलांची मागणी असो, स्वच्छतागृहांची मागणी असो लाखो आणी करोडोंच्या घोषणेत मात्र धूळ खात पडलेली आहे. शासकीय लाभापासून कोसो दूर ठेवल्यामुळे झालेली या समजाची दुर्दशा प्रकर्षणाने आजही जाणवते, तरीही परिस्थिती "जैसे थे" वर अडून आहे, शासन वर्गातील बडे बाबूंनी या समाजाला योग्य तो न्याय देत मुख्य प्रवाहाच्या वाटा यांच्यासाठी यांच्या येणाऱ्या पुढील पिढीसाठी मोकळ्या कराव्यात अशी अपेक्षा आहे, संघर्षातून आपल्या अस्तित्वाला टिकवणार्या या समाजाचा वापर केवळ मत पेटी इतकांचं मर्यादित न राहता यांच्या हक्क आणी न्यायांसाठी सभागृहात आणी रस्त्यावर उतरून सरकारला संविधानिक प्रश्न विचारणाऱ्या लढाऊ प्रतिनिधीची या समाजाला गरज आहे.



## आनंदी पहाट

## शिक्षणामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षणामध्ये आपले संपूर्ण जीवन बदलण्याची ताकद असल्याचे सर्वज्ञात सत्य आहे. शिकल्याने आपली विचार क्षमता आणि धारणा बदलते. शिकण्यामुळे पूर्वकल्पित कल्पना मोडून काढण्याकडे आपला कल असतो. शिक्षणातील हा फरक आपल्याला पूर्वग्रह न ठेवता इतरांशी संवाद साधण्यात आणि आपली क्षितिजे विस्तृत करण्यात मदत करतो. शिक्षणाचे कार्य चांगले आणि गंभीरपणे विचार करणे, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आणि मते विकसित करण्यात मदत करणे हे आहे. शिक्षण आपल्याला इतरांकडून आदर मिळवण्यात आणि आपले मन सक्षम करण्यात मदत करू शकते. शिक्षण समाजाला चांगल्यासाठी बदलण्यास मदत करते.

समाजात निरनिराळी मानसिकता असलेले विविध प्रकारचे लोक असतात. अनेक विचारांची व्यक्ती समाज, राजकारण आणि पर्यावरण यांसारख्या विविध विषयांवर चर्चा करू शकते. शिक्षणाद्वारे मिळवलेले ज्ञान आपल्याला योग्य निर्णय घेण्यास आणि योग्य मार्गावर चालण्यास मदत करण्यासाठी शक्तिशाली ठरत असते. समस्या नेहमी उपायांसह येतात, परंतु त्यांचे निराकरण करणे नेहमीच गोंधळात टाकणारे आणि कंटाळवाणे असू शकते, जिथे केवळ शिक्षण मदत करते. प्रत्येक समस्येचे कारण काय, कसे यासारख्या प्रश्नांची उत्तरे सुशिक्षित व्यक्ती योग्य प्रकारे जलदपणे देऊ शकतात. समस्या सोडवण्याची वृत्ती आपल्याला इतरांपेक्षा वरचढ करू शकते. गरिबीमुळे काही वेळा लोक त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत म्हणून थांबवतात. परंतु जर आपण आपल्या अभ्यास पूर्ण केला असेल तर शिक्षणामुळे कमाई निश्चितच वाढते, ते गरिबी हटवते. आपण आपल्या सभोवतालचे आणि समाजाचे भान ठेवले पाहिजे, जेणेकरून काही सुधारणा करता येतील. जगाचे ज्ञान आवश्यक आहे, जेणेकरुन आपल्या आजूबाजूला काय घडत आहे, याची आपल्याला चांगली जाणीव असेल आणि आपण बदल करू शकतो.



आधुनिक केसरी

## पिंपळ सोन्याचा | सळाळतो ||

भक्ती नी वैराग्य | प्रसवते जेव्हा ||
ज्ञानयोगी तेव्हा | जन्म घेतो ||१||
स्थितप्रज्ञा अंगी | कारूण्य उमाळा ||
आनंदी सोहळा | यातनांचा ||२||
सद्गुरू कृपेने | प्रज्ञा फळा आली ||
विश्वाची माऊली | ज्ञानराजा ||३||
करूनिया कर्म | उध्दरीले जना ||
माऊलींचा पान्हा | वागयज्ञ ||४||
लाभता विसावा | अजान वृक्षाचा ||
पिंपळ सोन्याचा | सळाळतो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

आक्षत भरिली भाणा । दुजा ब्राह्मण मेहुणा ।
आला होता पाहुणा । स्त्रियेस मूळ ॥१०॥
कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा ।
स्नानसंध्या म्हणे वृथा । कासया करावी ॥११॥
अभिळाषें सांची वित्त । स्वयें करी विस्वासघात ।
मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ॥१२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

ब्रह्मवेत्ता दरबार में, बैठो सज्जन होय ।
गो मन अङ्ग सम्हार कर, वाणी चपल न होय ।।२५।।(स्वर्वेद प्रथम मण्डल पंचम अध्याय) ०१/०५/२५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मनिष्ठ सद्गुरूंच्या धामी त्यांच्या सत्संग उपदेशात इंद्रियं, मन, वाणी आणि सर्वांगांना सावरून सभ्यता, व्यवहार युक्त होऊन, नम्रतापूर्वक, सज्जन होऊन बसले पाहिजे. सद्गुरूंचा उपदेश बुद्धी, मन एकाग्र करून शांत चित्ताने श्रवण केला पाहिजे. मन, इंद्रियं आणि वाणीच्या आलापात एकाग्रता होत नाही आणि हे शांत झाल्याशिवाय शांतीचा उपदेश प्राप्त होत नाही. म्हणून सद्गुरूंना शरण जाऊन शांत चित्ताने, विनयपूर्वक ब्रह्मविद्येचा तत्त्वज्ञान-बोध प्राप्त केला पाहिजे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूप

आधुनिक केसरी


अस्मानी सुलतानी आत्माराम आनंदवनभुवनी एकवीरा समाधी अर्थात् जुना दासबोध करुणाष्टके छत्रपती शिवाजी महाराजांना लिहिलेले पत्र दासबोध समर्थकृत देवी स्तोत्रे नृसिंहपंचक : हे काव्य लाटानुप्रासाचे उत्तम उदाहरण आहे. 'भीमरूपी महारुद्रा' सारखे स्तोत्र मनाचे श्लोक- मनाचे श्लोक एकूण २०५ आहेत. मारुति स्तोत्र मुसलमानी अष्टक रामदास स्वामींचे अभंग राममंत्राचे श्लोक समर्थांच्या उर्दू पदावल्यांचे



पुस्तक सवाई 'सुखकर्ता दुखहर्ता', 'लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा', 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनीं', यांसारख्या सुमारे ६१ आरत्या सोलीव सुख , आणि अप्रसिद्ध असलेला हजारो पानी मजकूर समर्थांचा अंतिम प्रवास : साहित्यातील वर्णन संवत्सरी दुर्मती । सज्जनगडी हो इमारती । दोन सहस्र निष्क प्रीती ।वेचिली राये ।। घर बांधिले विशाले । गृह प्रवेश करतीये वेले । वैशाख मासी भक्तपाले । प्रवेशले ।। तेव्हा बोलिले वचन । आम्हास राहाणे स्वल्प जाण ।। सांप्रत ज्यास मठ म्हणतात ती इमारत जीर्ण झालेली असल्याने अंगलाई देवालय व शेजारच्या तटातील ओवऱ्यांत समर्थांच्या राहण्याची व्यवस्था केली .१६०३ च्या रामनवमीनंतर चाफळहून समर्थ परत येईपर्यंत इमारत तयार झाली आणि समर्थ आल्यावर वैशाखापासून तेथेच राहू लागले. गृहप्रवेश करतेवेळेसच समर्थ उद्गारले 'येथे आता स्वल्प काळ राहणे आहे; खोलीचे बाहेर येणे किंवा कोणाशी बोलणे बहुतेक कमीच केले. उद्धवस्वामी व आक्काबाई यांशिवाय खोलीत कोणास येऊ देत नसत. कोणी काही कार्यभाग विचारले तर 'राम बुद्धी देईल तसे करा' म्हणून उत्तर देत. 'कोण्ही विचार पुसले काही । पूर्वीच सांगितले पाही । सांगावया आता काही । उरेचिना ।।' पितळेच्या खुराचा पलंग होता, त्यावर नित्य बसून असत. अन्नाचा आहार अगदी टाकला होता. पाच चार महिने तर केवळ दुधावरच होते. जवळ कोणास येऊ देत नसत. एखाद्यास प्रसंगोपात बोलाविले तर त्याने तेवढे येऊन काय आज्ञा आहे ते विचारून जावे.

## स्मरण ही कृती आहे

आधुनिक केसरी



गुरूने सर्व करावे ही गोष्ट सत्य आहे, आणि तो करतो हीही गोष्ट तितकीच सत्य आहे. पण आपण खरोखर सच्छिष्य आहोत की नाही हे पाहावे. देहातीत व्हायला, गुरुआज्ञेप्रमाणे वागणे यापरते दुसरे काय आहे ? ' मी देही नाही ' असे म्हणत राहिलो तर केव्हातरी देहातीत होईन. दुसरा मार्ग म्हणजे 'भगवंत माझा ' म्हणावे, म्हणजे देहाचा विसर पडतो. समर्थांचे नाव घेऊन सांगतो की, आपला नीतिमार्ग सांभाळा, आणि कोणताही प्रसंग आला तरी नामाला विसरू नका. ' मी जे जे करतो ते ते भगवंताकरिता करतो ' असे जो म्हणतो तो खरा आणि उत्तम भक्त होय. कर्तेपण घालवायला उत्तम भक्त व्हावे लागते. भक्ताचे लक्षण म्हणजे भगवंतप्राप्तीशिवाय दुसरे काही नको असे वाटणे. भगवंतापासून आपल्याला जे दूर सारते ते खरे संकट होय. तोच काळ सुखात जातो, की जो भगवत्स्मरणात जातो. खरोखर, स्मरण ही कृती आहे आणि विस्मरण ही वृत्ती आहे. भगवंताचे स्मरण करणे म्हणजे हवन करणे होय, आणि अभिमान नष्ट करणे म्हणजे पूर्णाहुती देणेच होय. वृत्ती भगवंताकार झाली पाहिजे. आपल्याला ज्याची आवड असते त्याचे स्मरण आपोआप राहते. विषय अंगभूत झाले असल्याने त्यांचे स्मरण सहज राहते; पण भगवंताचे स्मरण आपण मुद्दाम करायला पाहिजे. हे करणे अगदीच सोपे नाही; परंतु ते फार कठीण देखील नाही. ते मनुष्याला करता येण्यासारखे आहे. भगवंताची भक्ती ही सहजसाध्य आहे. ती अनुसंधानाने साध्य होते. अनुसंधान समजून केले पाहिजे; तिथे अनुभव लवकर येईल. पहाऱ्यावर शिपाई जसा जागृत राहतो, त्याप्रमाणे अनुसंधान जागृत ठेवले तर विषयांच्या संकल्पाचे पाय मोडतील. चोर चोरी करायला केव्हा येईल हे ओळखून, अनुसंधान चुकू देऊ नये. ताप आला की तोंड कडू होते, मग जिभेवर साखर जरी चोळली तरी तोंड गोड होत नाही. त्यासाठी अंगातला ताप गेला पाहिजे. त्याप्रमाणे, वरवर क्रिया करून दुःख नाहीसे होणार नाही. त्यासाठी अनुसंधानच पाहिजे. एक मुलगा परीक्षेसाठी मुंबईला आला. परीक्षा होईपर्यंत तो अडकून होता. परीक्षा संपली तेव्हा तो म्हणाला, ' आता मी मोकळा झालो बाबा ! ' नंतर चार दिवस तो मजेत मुंबईत हिंडला. त्याप्रमाणे, आपण अनुसंधान ठेवून प्रपंचाच्या आसक्तीतून मोकळे व्हावे, आणि मग मजेने संसार करावा; आपल्याला अगदी आनंदच मिळेल. उंबरठ्यावर दिवा ठेवला असताना ज्याप्रमाणे दोन्ही बाजूंला उजेड पडतो, त्याप्रमाणे भगवंताचे अनुसंधान हा उंबरठ्यावरचा दिवा आहे; त्याने परमार्थ आणि प्रपंच दोन्हीकडे उजेड पडेल. प्रपंचामध्ये वागताना मनाने थोडे लक्ष द्यावे लागते, याला भगवंताचे अधिष्ठान असणे म्हणजेच अनुसंधान ठेवणे होय. २७१. भगवंताच्या इच्छेने अकर्तेपणाने कर्म करणे, हेच अनुसंधान ठेवणे किंवा भक्ती करणे होय.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातील बौद्धिक प्रगल्भता


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ६ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# जे अडीच वर्षे केवळ घरात बसले त्यांना काय समजणार 'शासन आपल्या दारी'

## मुख्यमंत्री शिंदे यांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्ह्यातील परळी येथे 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, माजी आमदार पंकजा मुंडे आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, आतापर्यंत झालेल्या शासन आपल्या दारीमध्ये सगळ्यात यशस्वी हा कार्यक्रम झाला. ही रेकॉर्ड ब्रेक गर्दी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. आतापर्यंत वीस कार्यक्रम झाले. 1 कोटी 84 लाख लोकांनी 'शासन आपल्या दारी' योजनेचा लाभ घेतला. या कार्यक्रमाला बोगसगिरी म्हणजे या ठिकाणी उपस्थित असलेल्या सामान्यांचा अपमान करण्यासारखे असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. बदनामी करणाऱ्यांना योग्य वेळी उत्तर देणार असल्याचेही त्यांनी म्हटले. सरकारचा बोगस कार्यक्रम आहे असे काहीजण म्हणतात. अनेक लोक लाभ घेऊन गेले. जे अडीच वर्ष घरी बसले त्यांना काय कळणार शासन आपल्या दारीचे महत्व असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. अडीच वर्ष घरात राहून बोगसगीरी केली त्यांनी असं म्हणणं हा लोकांचा अपमान आहे. आता, त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मोठ्या प्रमाणावर लोक या कर्यक्रमाला येत आहेत. ही पोटदुखी त्यांच्या छातीत धडकी भरवणारी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. ग्रामपंचायत निवडणुकीत महायुतीला दोन तृतीयांश जागा मिळाल्या असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले.



**मुख्यमंत्री तुम्ही खरच राज्याचे एकनाथ : धनंजय मुंडे**
मुख्यमंत्री तुम्ही खरच राज्याचे एकनाथ असल्याचे प्रशंसोद्‌गार राज्याचे कृषिमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी काढले. सगळे एकत्रित मिळून या जिल्ह्याचा विकास करून दाखवू असे आवाहनही त्यांनी केले. 283 कोटी रुपये वैद्यनाथ देवस्थान साठी दिले असल्याचे मुंडे यांनी म्हटले. कोकणात तुम्ही कोकाकोलाचा प्रकल्प दिला. आता, आम्हाला 'फँटा' तरी द्या असे म्हणत धनंजय मुंडे यांनी परळी–बीडमध्ये उद्योगाची मागणी केली.

**कायदा हातात न घेता आपल्या मागण्या मांडा :** अजित पवार म्हणाले, तुम्ही तुमच्या मागण्या



जरूर मांडा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सविधानाच्या माध्यमातून आपल्याला हा अधिकार दिला आहे. परंतु, शांततेच्या मार्गाने आणि कायदा हातात न घेता आपल्या मागण्या मांडा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला शब्द दिला आहे की आरक्षणाचा प्रश्न लवकरच मार्गी लावला जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली आहे, अभ्यास सुरू आहे. राज्य सरकारचं कुठेही दुर्लक्ष झालेलं नाही किंवा होत नाही. आज या 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाच्या निमित्ताने मला हीच गोष्ट राज्यातल्या जनतेला सांगायची आहे. ते म्हणाले, ज्यांच्या तोंडात आरक्षणाचा घास घातलाय त्याला धक्का न लावता इतरांनाही आरक्षण देण्याची भूमिका महायुती सरकारची आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मी आणि मंत्रिमंडळातील आम्हा सर्व सहकाऱ्यांची तीच भूमिका आहे. राज्यातल्या विरोधी पक्षालाही आम्ही विश्वासात घेतलं आहे. मला जनतेला सांगायचं आहे की, आपल्याला आपल्या बापजाद्यांनी जाती–जातीत तेढ निर्माण करायला शिकवलेलं नाही. शांततेच्या मार्गाने सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील निकाल बघून मोदींची लाट दिसली. लाट संपली म्हणणाऱ्यांना सडेतोड उत्तर मिळाले असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले. हे शेतकरी कष्टकऱ्यांचे सरकार त्यांना वाऱ्यावर सोडणार नसल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी म्हटले.

# राजपूत करणी सेनेच्या अध्यक्षांची हत्या

## चार हल्लेखोरांनी घरात घुसून झाडल्या गोळ्या

आधुनिक केसरी न्यूज

**जयपूर :** राजस्थानची राजधानी



जयपूरमध्ये राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे अध्यक्ष सुखदेव सिंह गोगामेडी यांची गोळ्या झाडून हत्या झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या घटनेमुळे जयपूर हादरले आहे. हत्येची बातमी मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे. हल्लेखोरांनी गोगामेडी यांच्या घरात घुसून त्यांची हत्या केली आहे. हल्लेखोरांनी गोगामेडींवर एकूण चार गोळ्या झाडल्या. पोलिसांनी या घटनेची माहिती देताना सांगितले की, गोळीबाराचा आवाज ऐकून गोगामेडी यांच्या शेजारी राहणाऱ्या इतर लोकांनी गोगामेडींच्या घराकडे धाव घेतली. हल्ला झाला तेव्हा गोगामेडी यांच्याबरोबर घरात उपस्थित असलेले अजित सिंह हेदेखील या हल्ल्यावेळी गोळी लागून गंभीर जखमी झाले आहेत. या हत्याप्रकरणाची माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, सुखदेव सिंह गोगामेडी मंगळवारी दुपारच्या वेळी त्यांच्या घरीच होते. दुपारी १.४५ वाजता चार हल्लेखोर मोटरसायकलवरून त्यांच्या घरी आले. त्यांनी घरात घुसून गोगामेडी यांच्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. तर त्यांच्याबरोबर असलेले अजित सिंह गंभीर जखमी झाले आहेत. श्यामनगर पोलीस या हत्याप्रकरणाचा तपास करत आहेत. एक हल्लेखोर पोलीस चकमकीत ठार या हत्या प्रकरणावर बोलताना जयपूर पोलीस आयुक्त बी. जी. जॉर्ज जोसेफ म्हणाले, हल्लेखोर कोण होते याची माहिती मिळाली आहे. हल्लेखोरांच्या मागावर गेलेल्या पोलीस आणि हल्लेखोरांमध्ये चकमक झाली. या चकमकीत एक हल्लेखोर ठार झाला आहे. नवीन सिंह शेखावत असे त्याचे नाव असून तो जयपूरच्या शाहपुरा येथील रहिवासी होता. शाहपुरात त्याचे एक छोटे दुकान आहे. इतर दोन हल्लेखोर रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तीची स्कूटर घेऊन पळून गेले.

हल्लेखोरांनी सुखदेव सिंह गोगामेडी यांच्या घराबाहेर असलेल्या सुरक्षा रक्षकाशी बातचीत केली. गोगामेडी घरात असल्याची माहिती घेतली आणि मग ते घरात घुसले. आत जाऊन ते गोगामेडी यांच्याशी बोलत होते. बातचीत सुरू असतानाच हल्लेखोरांनी गोगामेडी यांच्यावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला.

**'पद्मावत' चित्रपटाला गोगामेडींनी केला होता विरोध :** २०१७ मध्ये जयगडमध्ये दीपिका पदुकोणच्या 'पद्मावत' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान राजपूत करणी सेनेच्या लोकांनी तोडफोड केली होती. 'पद्मावत' चित्रपट आणि गँगस्टर आनंदपाल एन्काउंटर प्रकरणानंतर राजस्थानमध्ये झालेल्या आंदोलनामुळे गोगामेडी प्रसिद्धीच्या झोतात आले होते.

**दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांना गोगामेडींनी मारलेली थप्पड :** सुखदेव सिंह गोगामेडी यांनी बॉलीवूड दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांना 'पद्मावत' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान सेटवर थप्पड मारली होती. सुखदेव सिंग गोगामेडी यांनी या चित्रपटाला खूप विरोध केला होता. या चित्रपटाचे नाव 'पद्मावती' ठेवण्यात आले होते, पण राजपूत करणी सेनेच्या विरोधानंतर निर्मात्यांना चित्रपटाचे नाव बदलून 'पद्मावत' ठेवावे लागले होते. तसेच अनेक दृश्येही चित्रपटातून हटवली गेली होती. या चित्रपटाला केलेल्या विरोधानंतरच सुखदेव सिंह गोगामेडी राजपूत समाजातील तरुणांमध्ये खूप लोकप्रिय झाले होते.






# मोदींच्या गॅरंटीने महाराष्ट्र व मुंबईचा गुन्हेगारीत दुसऱ्या क्रमांकावर 'लौकिक'

## नाना पटोले : हिवाळी अधिवेशनात सरकारला जाब विचारणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र व मुंबईचा आजवर मोठा नावलौकिक होता, याला भारतीय जनता पक्षाच्या सरकारने कलंक लावला आहे. राष्ट्रीय गुन्हा नोंद विभागाने (NCRB) ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार महिला अत्याचार, खूनासारख्या गंभीर गुन्ह्यात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे तर महिलांसाठी देशात सर्वात सुरक्षित असलेले मुंबई शहर आता महिला अत्याचारांमध्येही दुसऱ्या क्रमांकावर आहे. मोदींची गॅरंटी व शिंदे, फडणवीस व अजित पवारांच्या सरकारने गुन्हेगारीच्या बाबतीत महाराष्ट्राला उत्तर प्रदेशच्या पंगतीत बसवून नावलौकिकाला कलंक लावला आहे, अशी जळजळीत टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीचे सरकार कटकारस्थान करून पाडून असंवैधानिक मार्गाने सत्तेत आलेल्या भाजपा सरकारमधील आमदार, खासदारच गुंडगिरी करतात, गोळीबार करतात, हातपाय तोडण्याची धमकी देतात, लोकप्रतिनिधींनाही धमक्या दिल्या जात आहेत. अपहरणात महाराष्ट्र व मुंबईचा दुसरा क्रमांक आहे. राज्यातून महिला व मुली बेपत्ता होण्याच्या प्रकारात प्रचंड वाढ झालेली आहे. महिला अत्याचारात राज्यात १५ टक्क्यांची वाढ झालेली आहे तर मुलांवरील अत्याचारात २० टक्क्यांनी वाढ झालेली आहे. राज्यात दर तासाला महिला अत्याचाराच्या पाच गुन्ह्यांची तर लहान मुलांवरील अत्याचारांच्या दोन गुन्ह्यांनी नोंद होत आहे. भाजपाची 'बेटी बचाव', योजना कागदावरच दिसत आहेत, प्रत्यक्षात परिस्थीती अत्यंत भयावह आहे हे अहवालावरूनही स्पष्ट होत आहे. महिला बेपत्ता प्रकरणासंदर्भात पोलीस महासंचालकांकडे काँग्रेस शिष्टमंडळाने तक्रार दाखल केली होती, राज्यपाल महोदयांकडेही राज्यातील कायदा सुव्यवस्थेसंदर्भात निवदेन दिले होते पण भाजपा सरकारच्या कारभारात काहीही फरक पडलेला दिसत नाही. एनसीआरबीच्या अहवालातील गुन्हेगारीचे आकडे महाराष्ट्रासाठी धोक्याचे आहेत.

मुंबई पोलिसांचे जगात मोठे नाव आहे, महाराष्ट्र पोलीसांची कामगिरीही यापूर्वी चांगली राहिली आहे पण भाजपा सरकारच्या काळात पोलीस दलात होत असलेला सत्ताधारी पक्षांचा हस्तक्षेप ही गंभीर बाब आहे. गृहखात्याला पुर्ण वेळ मंत्री नाही, देवेंद्र फडणवीस यांना सहा-सहा जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद, इतर विभागाचा कारभार व पक्ष फोडाफोडीतून गृहविभागाकडे लक्ष देण्यास वेळच मिळत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे शहरात गुन्हेगारी व अवैध धंद्यांचे पेव फुटले आहे. उपमुख्यमंत्री व गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांचा गृहजिल्हा नागपूरातही गुन्हेगारी वाढलेली आहे तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुण्यात कोयता गँगने हैदोस माजवला आहे. दुसऱ्यांचे पक्ष फोडून खुर्ची मजबूत करण्यातून या तिघांनाही राज्यातील कायदा सुव्यवस्थेकडे लक्ष देण्यास वेळ नाही. राजकीय साठमारीत महाराष्ट्रात गुन्हेगारी बोकाळली आहे, याला वेळीच आळा घातला नाही तर गंभीर परिस्थीतीला तोंड द्यावे लागले. ७ तारखेपासून सुरु होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात सरकारला यावर उत्तर द्यावेच लागले, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे.

# विजयाचा बाप कोण?

आधुनिक केसरी

पाच राज्यांचे निवडणूक निकाल लागले आहेत. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये भाजपाची सत्ता आली आहे. मध्य प्रदेशमध्ये तर भाजपाने रेकॉर्ड ब्रेक मते मिळवली आहेत. आता या सगळ्या निकालांवरुन २०२४ ची लोकसभा निवडणूकही भाजपाच जिंकणार असे अंदाजही व्यक्त होत आहेत तसंच भाजपा नेत्यांनीही तसा दावा केला आहे. सामनाच्या अग्रलेखातून भाजपावर जोरदार टीका करण्यात आली आहे. तसंच मोदींची गॅरंटी या शब्दाचाही समाचार घेण्यात आला आहे. पाचही राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल लागले आहेत. २०२४ च्या लोकसभेची सेमी फायनल भाजपाने जिंकली आहे. मात्र सेमी फायनल जिंकणारा फायनल जिंकतोच असे नाही. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फायनल जिंकण्याची गॅरंटी दिली आहे. जो तो आपल्या पद्धतीने पाचही राज्यांमधल्या जय-पराजयाचे विश्लेषण करत आहे. मिझोरम विधानसभा निवडणुकीचाही निकाल लागला आहे. तिथे स्थानिक पक्षांना यश मिळाले आहे. देशाचे किंवा जगाचे नेते असलेले पंतप्रधान मोदी तेलंगणाप्रमाणे मिझोरामही जिंकू शकलेले नाही. देशात सर्वत्र मोदी मॅजिक चाल नाही. अनेक राज्यांतील लोक सुज्ञ आणि विचारी आहेत. त्यामुळेच देशात लोकशाही पूर्णपणे खतम करता आलेली नाही. भारतीय जनता पक्षाने मोदींच्या गॅरंटीवर शिक्कामोर्तब केले तर राहुल गांधींच्या मोहब्बत की दुकानवर शुकशुकाट झाल्याचा दावाही भाजपाने केला. हे गॅरंटी प्रकरण काय आहे? मोदींनी २०१४ पासून अनेक 'गॅरंट्या' दिल्या होत्या. प्रत्येक निवडणुकीत त्यांचे गॅरंटी कार्ड वाढत असते. परदेशातला काळा पैसा परत आणण्याची गॅरंटी होती त्याचे काय झाले? भ्रष्टाचाराचे समू उच्चाटन करुन भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात टाकण्याची गॅरंटी होती त्याचे काय झाले? काही भ्रष्टाचारी भाजपाने पळवून लावले आणि उरलेले होते त्यांना पक्षात घेऊन मंत्री करण्यात आले.भ्रष्टाचाऱ्यांना भाजपात आणून शुद्ध करायचे ही नवी गॅरंटी आहे. काश्मीरसह देशातला दहशतवाद संपवण्याची गॅरंटी होती. मोदींच्या डोळ्यासमोर पुलवामा, पठाणकोट, उरी घडे. काश्मीरमध्ये रोज जवानांच्या हत्या सुरू आहेत. मणिपुरातील दहशतवादाने कहर केला आहे. काय झाले दहशतवाद संपवण्याच्या गॅरंटीचे? पेट्रोल ४० रुपये लिटर करण्याची गॅरंटी होती. वर्षाला दोन कोटी रोजगार देण्याची गॅरंटी होती. शेतकऱ्यांचे उत्पन्न डबल करण्याची गॅरंटी होती. डॉलरच्या तुलनेत रुपया ३०-३५ रुपयांवर आणण्याची गॅरंटी होती. काय झाले तुमच्या गॅरंटीचे? अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारण्याची गॅरंटी होती. मराठा आणि धनगरांना आरक्षण देण्याची गॅरंटी होती. महागाई कमी करुन जनतेला अच्छे दिन दाखवण्याची गॅरंटी होती. या सर्व 'गॅरेंट्या' मोदींनीच दिल्या होत्या. त्यातली एकही गॅरंटी पूर्ण झाल्याचं दिसत नाही. तरीही तीन राज्यांत भाजपाचा विजय होतो हीच लोकशाहीची गंमत आहे. कोणतीही गॅरंटी पूर्ण न करता मोदींना विजय मिळतो आणि त्याचा उत्सव साजरा होतो. त्यामुळे या विजयाचा बाप कोण? असा प्रश्न पडतो.

# आंबेडकरी समाजाच्या आयुष्यातील सहा डिसेंबर



प्रज्ञाधर ढवळे
संपर्क क्र. 9890247953

आधुनिक केसरी

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेची पुनर्रचना करीत असतांनाच आंबेडकरी समाजाची स्थापना केली. आंबेडकरी संस्कृतीची निर्मिती केली. ही संस्कृती भगवान बुद्धांच्या सौंदर्य संविधानावर आधारलेली आहे. बाबासाहेबांच्या जगण्याचा आणि झिजण्याचा इतिहास आपण समजावून घेऊ शकतो. सहा डिसेंबरला विविध प्रकारे अभिवादन आपण करु शकतो. सहा डिसेंबर म्हणजे बाबासाहेब या जगातून कायमस्वरूपी गेल्याची आठवण नाही.**

तो दुःखाचे पडघम वाजवित, दुःखाश्रू गाळीत बसण्याचा कार्यक्रम नाही. एक लक्षात घ्यायला हवे बाबासाहेबांनी आंबेडकरी समाजासाठीच नव्हे तर इथल्या तमाम भारतीयांसाठी खूप काही केलं म्हणून त्यांना मरता आलं नाही. त्यांच्यासाठी हरेक दिवस रणसंग्रामाचाच होता. भीषण रात्रींचा सोपा, सुगम अनुवाद करुन पिढ्यानपिढ्यांच्या अंधारलेल्या आयुष्यांना उजेडाची निळी पहाट देणारा तिसरा डोळा होता. बाबासाहेब ज्वालामुखीच्या धबधब्याखाली स्वतः उभे राहिले आणि आपल्यांसाठी चमचमत्या चांदण्यांचं अंतरिक्ष निर्माण केलं. विझलेल्या लक्षावधी हातात क्रांतीच्या विजा दिल्या आणि पराभूत झालेल्या डोळ्यांसमारे स्वप्नांचा समारंभ आयोजित केला. एकापाठोपाठ लेकरं सोडून जात राहिली पण बाबासाहेब मृत्यूच्या क्षितीजातून सतत उगवत राहिले. मानवी जगण्याच्या वाळवंटाला मरुद्यानाची दीक्षा दिली. कोसळलेल्या माणसांना उभं राहण्याचा सिद्धांत या दुनियेला बाबासाहेबांनीच दिला आहे. सहा डिसेंबर आंबेडकरी समाजाच्या आयुष्यात मृत्यूचा दिवस नाही तर तो बाबासाहेब म्हणून जन्माला येण्याचा आणि जगण्याचा विषय आहे.

सहा डिसेंबर १९५६ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्राणज्योत मालवली. आम्ही त्याला महापरिनिर्वाण दिन म्हणतो. जगाला वाटले कोट्यवधी दीनदलितांचा, अस्पृश्यांचा वाली गेला. नाही!!! हे साफ खोटं आहे. बाबासाहेबांचे शरीर इतरांप्रमाणेच नश्वर होते, ते नष्ट झाले. बाबासाहेब पुस्तकांच्या रुपातून, विचारांमधून, हक्क आणि अधिकारासाठी लढणाऱ्या आंदोलनातून, जयभीमच्या नव्या क्रांतीयुद्धातून बाबासाहेबांचा नवा जन्म सतत होत राहिला. लोकांनी त्यांना पुतळ्याच्या स्वरूपात उभे राहिले. सतत प्रेरणा देत राहिले; आजही देत आहेत. बाबासाहेब नेहमीच विविध माध्यमांतून तुमच्या भेटीला येत असतात. तुम्हाला मार्गदर्शन करीत राहतात. तुम्हाला त्यांना समजून घेण्याआधी ते ऐकायचे आहेत, वाचायचे आहेत, अभ्यासायचे आहेत. चैत्यभूमीवर लक्षावधींची गर्दी केवळ एका दिवसापुरती नसते. आपल्या महामानवाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, नवे संकल्प उभे करण्यासाठी एकत्र आलेली असते. महू, दीक्षाभूमी आणि भीमा कोरेगाव ही स्थळे प्रेक्षणीय नाहीत. ती क्रांतीची मशाल तुमच्या अंतरात शिलगावत असतात. सहा डिसेंबर आंबेडकरी समाजाच्या आयुष्यातील रडापडीचा केवळ दुःख व्यक्त करण्याचा दिवस नाही. तसेच पणतीज्योत रॅली काढून, गाणीबजावणी करुन, भाषणांचा महापूर वाहवून, धम्मविषयक गाथापठण करुन, महारक्तदान शिबिरांचे आयोजन



किंवा आणखी काही नवसंकल्पनांची अंमलबजावणी करुन साजरा करण्यापेक्षा तुम्हाला तुमच्या जबाबदारीची अधिक जाणिव करुन देणारा हा दिवस आहे. सहा डिसेंबर रोजी आपण बाबासाहेबांना अभिवादन करीत असतो. डोळे भरून त्यांना पाहून घेतो. त्यांनी दाखवलेले बोट तुम्हाला तुमच्या जबाबदारीची जाणीव आणि दिशानिर्देशन करीत असते, तेही तुम्ही पाहत असता. एखादे दोन किंवा काही पुस्तके घेऊन घरी जाता. यावेळी आपल्याला बाबासाहेबांनी पुस्तकांसाठी घर बांधावे याची आठवण होते. आपण कार्यकर्ते किंवा नेते म्हणून काम करीत असू तर आपल्याला असे वाटते की आपली जबाबदारी आता अधिक आहे. घराच्या भिंतीवर ती कोरण्यासाठी हातात लेखणी देणारी असते. आपण बाबासाहेबांचे विचार स्विकारलेच आहेत तर त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपल्याला आपल्या हक्क आणि अधिकाराची जाणीव आहे त्यामुळे ही लढाई आजही प्राणपणाने लढत आहोत. हा संघर्ष संपलेला नाही याची जाणीव आपल्याला आहे. संघटनांची गरज आहे आणि आपण एकत्वाने आंदोलने पुकारली पाहिजेत, हे आपणा सर्वांना चांगलेच कळते. आपण आपल्या समाजावर समाज घटकांवर अन्याय अत्याचाराविरोधात पेटून उठतो. मला चीड येत नाही हाच माझा गुन्हा हे काही येथे लागू पडत नाही. चिडण्याची आणि पेटण्याची प्रक्रिया सतत सुरू असते. यातून एखादे नवे नेतृत्व आंबेडकरी मुशीतून उदयाला येते याचे आपण साक्षीदार असतो. ही आंबेडकरी चळवळ प्रबोधनाची, वैचारिक परिवर्तनाची, राजकीय पक्ष संघटनांची, साहित्य चळवळीची आणि रस्त्यावरच्या आंदोलनाचीही असते. ती धम्म चळवळ म्हणूनही गतिमान होत असते. ती मागे नव्हे किंवा एकाच ठिकाणी ठेवण्याची नव्हे तर पुढे आणि पुढेच जाण्यासाठीच्या अनेक कृतींचीच असते, याची जाणीव आपल्याला सहा डिसेंबर हा दिवस करुन देत असतो. सहा डिसेंबर आंबेडकरी समाजाच्या आयुष्यात बाबासाहेबांचा महापरिनिर्वाण दिन म्हणून दरवर्षी येत असतो. तो नेमेचि येतो आणि आपण काय करतो? हा प्रश्न अत्यंत खोचकपणे आपण आपल्यालाच विचारायला हवा. स्वतःला तीक्ष्ण, धारदार शस्त्राने टोचवून घेऊन आणि रक्तबंबाळ करवून घेऊन विचारायला हवा. ही आजची खरी गरज आहे. आंबेडकरी समाजाच्या आयुष्यात सहा डिसेंबर येण्यापूर्वी चौदा ऑक्टोबर आलेला आहे. या चौदा ऑक्टोबरने मोठीच उलथापालथ केलेली आहे. ही एक महान जाणीव आहे. ती आजोबाने आपल्या मुलांना आणि मुला मुलींनी आपल्या मुला मुलींना दिलेली आहे. हा उजेड आपण एका तळहातावरुन दुसऱ्या तळहातावर ठेवीत असतो. अंधारावर उजेडाने मात करण्याचे धम्मचक्र सतत कार्यशील करीत असतो. ते कधीच थांबत नसते. ते कधीही थांबूच नये असे आपणा सर्वांना वाटत आले आहे. मग प्रश्न कुठे निर्माण होतो?

तो होतो आपण स्वार्थासाठी इमान गहाण ठेवण्याचा, मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन असण्याचा, वाममार्गाने भरमसाठ संपत्ती गोळा करण्याचा, दुसऱ्याला लुटण्याचा, उध्वस्त करण्याचा, एकनिष्ठ वा एकजूट न राहण्याचा, राजकीय गुलामगिरीचा स्वीकार न करण्याचा, एक बोलण्याचा आणि दुसरे, तिसरेच वागण्याचा, एकंदरीत काय तर आंबेडकरी निष्ठांना तिलांजलीच देण्याचा हा महाप्रश्न निर्माण होतो.

सहा डिसेंबर आंबेडकरी समाजाच्या आयुष्यात युवकांसाठी, युवतींसाठी, उपासक - उपासिकांसाठी, बालक बालिकांसाठीही माझा नवा जन्म होत आहे या क्रांतिकारी पुनर्रचनेची कार्यशाळा घेऊन येतो. आपापसात वाद निर्माण करण्यासाठी किंवा ते विकोपाला नेण्यासाठी येत नाही. तर ते कायमस्वरूपी मिटविण्यासाठी येत असतो. वाईट मार्गावरुन योग्य मार्गावर येण्याचे आवाहन करण्यासाठी येत असतो. हातात खंजीर घेऊन दुसऱ्याचा मुडदा पाडण्याच्या विचारापासून परावृत्त करण्यासाठी येत असतो. वाईट व्यसनांचा त्याग करून चांगल्या सवयींची लागण करण्यासाठीची बौद्धिक प्रगल्भता निर्माण व्हावी यासाठी येत असतो. आंबेडकरी विचारांशी कदापिही फारकत न घेण्याबाबत सावधानतेचा इशारा देण्यासाठी येत असतो. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या माणूस नावाच्या सौंदर्याची देखभाल करण्याची सूचना देण्यासाठी हा दिवस येत असतो. तुम्हाला नवे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठीही तो येतो. ज्यांच्याकडे धनसंपदा मोठ्या प्रमाणावर आहे त्यांनी चळवळीला जमेल तसे खतपाणी घालावे, ज्यांच्याकडे अधिकचे खरे ज्ञान आहे, विचार आहेत त्यांनी मानधनाची अपेक्षा न करता ते वाटप करावे, ज्यांच्याकडे पैसा नसेल पण शक्ती आहे, वेळ आहे त्यांनी तो दान करावा. ज्यांच्याकडे अहंकार, हेव्यादाव्याची वळचण आहे, मत्सरांनी, कट - कपट - कारस्थानांनी बरबटलेली काया आहे ती आगीच्या भक्ष्यस्थानी ठेवावी. त्यानंतर बुद्धाची निकोप साधना करावी. आंबेडकरी संस्कृतीच्या वृद्धीसाठी, प्रचार प्रसारासाठी पुढे यावे. इतरांना आमंत्रण देऊ नये, आपल्यापासून सुरुवात करावी. सहा डिसेंबर फक्त महापरिनिर्वाणदिन साजरा करण्यासाठीच नव्हे तर नव्या भीमसंकल्पांचे नवे वर्ष घेऊन उगवण्यासाठी येत असतो, हे लक्षात ठेवावे.

# एक सशक्त विचार देखिल जगाची दिशा बदलू शकतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मनुष्य हा जगातील सर्वात बुद्धिमान प्राणी असुन सकल सृष्टीवर असणार्या प्राणीमात्रांवर मानवाने आपल्या बुद्धीच्या कल्पकतेने प्रभाव निर्माण केला आहे.चिंतन मनन ध्यान, साधना या मधून तत्त्व चिंतन करून तत्त्वज्ञान निर्माण होत.आपल्याला सुचलेल्या कल्पना,युक्ती, योजना,अवधारणा,भाव,या मधून निर्माण होणारी दिशा म्हणजे विचार हाच विचार जगाची दिशा बदलु शकतो एवढं मोठं आणि अगाध सामर्थ्य आपल्या विचारात असत.या सृष्टी वर सामान्य अथवा सर्वसाधारण कोणीही नाही फक्त त्याचा बोध आपल्याला झाला पाहिजे आणि बोध झाल्याशिवाय विचार प्रकट होत नाही.बोधा झाला कि आपोआप विचारांचा जन्म होतो.आपण सामर्थ्यवान आहेत स्वतःला दुय्यम कधीच समजू नका आपला एक विचार देखिल जगाची दिशा बदलण्याच ब्रह्म अस्त्र ठरू शकतो.**

म्हणून आपण स्वतः सर्वसाधारण नक्कीच नाहीत याची जाणीव ठेवून आचरण केल तर एक दिवस नक्कीच जीवना बरोबर जगाची दिशा बदलण्याची ताकद आपल्या मध्ये निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.आपली कल्पना हि आपल्या दिव्य ज्ञानाची प्रचिती असते ज्ञानाला तत्त्व चिंतन करण्याची जोड दिली तर त्यामधून आपोआप तत्त्वज्ञान निर्माण होत.आपली कल्पकता हि दिव्य आणि सत्यनिष्ठ चिंतन या माध्यमातून आपल जीवन बदलण्याची ताकद आपल्याच विचारात असते. जग बदलणारे विचार निर्माण करणारा देखिल मनुष्य असल्याने आपला एक सशक्त आणि सुसंकृत विचार देखिल जग बदलू शकतो.एवढ मोठं सामर्थ्य शक्ति ताकद आपल्या विचारामध्ये असते.पण असे सशक्त विचार आपल्याला निर्माण करता आले पाहिजेत.जीवनात स्वतःला कमजोर अथवा दुबळ कधीच समजू नका जगात कोणीही सर्वसाधारण नसतं.आपल अस्तित्व आपल्याला समजलं पाहिजे आणि ते योग्य वेळी सिद्ध देखिल करता आलं पाहिजे.आपले सशक्त विचार हेच आपलं आभुषण असतात. जीवनातील विचारांचं महत्व प्रचंड मोठ आहे. पण या विचारांना कृतीची जोड मिळाली पाहिजे. आपल वागणं आणि बोलणं या मध्ये अंतर नसल पाहिजे.जगातील कोणत्याही प्रकारच परिवर्तन होण्यासाठी सशक्त विचार हेच दिशा दर्शक ठरत असतात. परिवर्तनाची क्रांती सहज होत नसते.इतिहासाची पानं चाळाली तर प्रत्येक काळात युगात एक सशक्त विचार हाच जगाची दिशा बदलतो हे वास्तव आहे.सशक्त विचारांची शक्ती आणि प्रभाव हा खुप मोठा असतो.सशक्त विचार लोक वार्याच्या गतीने स्वीकारता.असे विचार निर्माण होण्यासाठी मन बुद्धी हदय पण तितक्याच सात्विकतेने तुडुंब भरलेलं असलं पाहिजे. शुद्ध बीजा पोटी फळ रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे सात्विक हृदयातून सशक्त विचार निर्माण होत असतात.विचार कृतीशील असतील तर सामाजिक पातळीवर लोक त्याच आपोआप अनुकरण करतात.आपले विचार इतरांनी स्वीकारले पाहिजेत त्याच बरोबर ते इतरांसाठी दिशादर्शक ठरले पाहिजेत यासाठी यांचा आरंभ स्वतः पासून झाला पाहिजे.वैचारीक परिवर्तन हेच खरं अर्थाने सामाजिक पातळीवर बदल घडवून आणत असत.आपले विचार आपलं मत हे जगाच्या कल्याणासाठी हितार्थ उपयोगी ठरल पाहिजे.जगाच्या कल्याणासाठी आपलं योगदान असलं पाहिजे हे वाटण स्वभाविक आहे आणि याच प्रयत्नांचा भाग म्हणून इतर कोणत्याही प्रकारच योगदान नाही देता आलं तरी आपण एक सशक्त विचार तर नक्कीच निर्माण करू शकतो आणि हेच आपलं सामर्थ्य आपण यशस्वी केल पाहिजे.परिवर्तन होण्याची इच्छा आपण बाळगत असु तर सुरवात हि कधी ही आपल्या स्वतःपासुन झाली पाहिजे.बोलणं आणि आचरण या मध्ये अंतर नसेल तर लोक त्या शब्दांना महत्व देतात अन्यथा दैनंदिन सुर्य उगवला कि कित्येक विचार निर्माण होतात आणि सुर्यास्त बरोबर ते विचारही संपुष्टात येतात म्हणून विचारांना कृतीची जोड असलीच पाहिजे.आणि विचारांना कृतीची जोड नसली तर मग मात्र पोकळ विचार निर्थक ठरतात .लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः कोरडे पाषाण हि उक्ति शंभर टक्के तर्क संगत आहे.एखादी बाब आपण लोकांना सांगत असताना आपण कोण काय आणि आपण त्या मार्गावर कुठे आहेत त्याला खूप मोठं महत्त्व आहे.स्वतः मध्ये परिवर्तन करून लोक उपयोगी आचरण केले कि लोक आपोआप आचरण करतात . परिवर्तनाला सुरवात स्वतः पासून केली तर त्या परिवर्तनाचे क्रांती मध्ये रूपांतर होते. विद्वान होऊन समाजाला दिशा देयची असेल तर सर्व प्रथम आपण स्वतः ला दिशा द्यावी लागेल. आणि आपण स्वतःला दिशा देऊन स्वतः मध्ये अपेक्षित बदल घडवून आणू तेव्हा मात्र आपल्या मध्ये झालेला बदल पाहुन अनेक लोक आपलं अनुकरण नक्कीच करतील या मध्ये तीळमात्र शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# पीर बाजार हा सोमवारीच भरला पाहिजे

## ॲड. अभय टाकसाळ : ट्रॅफिकला पथविक्रेते जबाबदार नाहीत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिवाजीनगर रेल्वे फाटक एक महिन्यापासून बंद असल्या कारणाने वाहतुकीचा खोळंबा होत आहे, असे म्हणत मनपाने पीर बाजार येथील सोमवारी भरणारा बाजार रविवारी भरण्याचा निर्णय घेतला. पण रविवारी मोंढा येथेही बाजार भरत असल्याने पीर बाजार येथे व्यापारी फिरकनासे झालेत. त्याचा फटका व्यवसायावर होत असल्याचे संबंधित व्यापाऱ्यांनी सांगितले आहे. पीर बाजार हा सोमवारीच भरला पाहिजे, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. याबाबत शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

यावेळी ॲड. अभय टाकसाळ म्हणाले की, शहरातील सिटी बस बंद करण्यात आली होती. त्या काळात नाईलाजास्तव नागरीकांना मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी विकत घ्याव्या लागल्या. एका एका घरात दोन ते तीन दुचाकी आहेत. पेट्रोल आणि दूचाकीची किंमत वाढत आहेत. मजबुरीने वाहन विकत घ्यावी लागली. सार्वजनिक वाहतूक कमजोर केल्यामूळे हे घडले. रस्ते कितीही मोठे केले, उड्डाणपूल बांधले तरीही वाहनांची संख्या वाढत जाणार आहे. त्यामूळे वाढत्या ट्राफीकला पथविक्रेते जबाबदार नाहीत. गेल्या ५० वर्षांपेक्षा जास्त काळापासून पीर बाज़ार (सोमवार) उस्मानपुऱ्यात भरत होती. शहरातील सीटी बस (सार्वजनिक वाहतुक) व्यवस्था कमी केल्यामूळे शहरातील लोकांनी मजबुरीने दुचाकी वाहन खरेदी केल्या. वाहनांच्या संख्या वाढल्या. त्याला जवाबदार दुचाकी वाहन घेणार नागरीक कींवा हातगाडीवाले, बाजारातील व्यापारी नसून म. न. पा. प्रशासन व राजकारणी आहेत. ट्राफीक जाम होते म्हणून उस्मानपुऱ्यातून पथविक्रेत्यांना काढुन भाजीवाली बाईच्या पुतळ्याकडे हालवण्यात आले, नंतर तेथुन परत शहानूरमियाँ दर्गा जवळील मैदानात हाकलण्यात आले. आता अचानक मनमानीपणे पथविक्रेत्यांशी चर्चा न करता आपला बाजार सोमवारी ऐवजी रविवारी भरवायचा एकतर्फी निर्णय घेण्यात आला. हा निर्णय आम्हाला मान्य नाही. पीर बाजार हा सीमवारीच भरला पाहीजे. गांधीनगरचा बाजार आणि दर्गाजवळचा बाजार रविवारीच असल्याने व्यवसायावर परीणाम झाला आहे. कमाई होत नाही, माल वाया जातो. वाहनांची संख्या ही दिवसेंदिवस वाढतच जाणार, ट्राफीक कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतुक व्यवस्था (सीटी बस) वाढवल्या पाहीजे, ते म. न. पा. करीत नाही. त्यांची तशी इच्छा नाही. बाजारातील व्यापाऱ्यांच्या पोटावर लाथ माराल तर त्याचे उत्तर नक्की मिळेल, असा इशारा शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन संलग्न आयटक व नॅशनल हॉकर्स फेडरेशन देत आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची लोकसंख्या देखील आपल्या शहराच्या जवळपास आहे. तेथे ट्राम आणि सिटी बस मोफत असल्याने रस्त्यावर खाजगी वाहने दिसत नाही. सरकाला रस्ते मोठे करण्यासाठी जमीन अधिग्रहण करण्याची गरज पडत नाही. यामध्ये सरकारी पैशांची बचत व अधिकाऱ्यांचा, पोलीसांवर ताण कमी होतो असा अनुभव मेलबर्नचा आहे.

दर्गा चौकातील सोमवार बाजार (पीर बाजार) तुम्ही रविवारी करण्याचा निर्णय घेतल्याचे कळाले आहे. हा निर्णय पथविक्रेत्यांवर अन्यायकारक आहे. गांधीनगर येथे देखील रविवार बाजार आणि दर्गा चौकातही रविवार बाजार झाल्यास पथविक्रेत्यांना एकाच ठिकाणी बाजार करता येईल आणि पथविक्रेत्यांचे नुकसान होईल. आपण घेतलेला अन्यायकारक निर्णय पथविक्रेत्यांशी चर्चा न करता घेतला आहे. पथविक्रेता उपजिवीका संरक्षण व विनिमयन कायदा २०१४ च्या तरतुदीचे आपण उल्लंघन केले आहे. हा अन्याय पथविक्रेते सहन करणार नाहीत. यावेळी गांताबाई सुभाष पवार, विमलबाई जाधव, राखी रमंडवाल, सुनिता कांबळे, शेख समीर, नोबाबाई करवंदे, सविना लवले, गंगुबाई नवले, चंद्रकलाबाई ताबड़े, कांचन दाभाडे, भारतीबाई, शेरुभाई, वर्षा भोवते, लिलाबाई बनसोडे, मंगल धोर्जे, राम करवंदे, घनशान करवंदे आदींची उपस्थिती आहे.

# प्रदीप चव्हाण यांची सोयगाव भाजपा तालुका अध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** भारतीय जनता पार्टी सोयगाव कार्यकारिणी व विविध मोर्चा व आघाडीची कार्यकारिणी सोयगाव तालुका अध्यक्ष बद्रीभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी सोयगाव तालुक्यातील नांदा तांडा येथील युवा नेता म्हणून ओळखले जाणारे प्रदीप चव्हाण यांची भटक्या विमुक्त जाती आघाडी तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. प्रदीप चव्हाण यांनी पक्षा साठी केलेल्या कामगिरी आणि एकनिष्ठते बद्दल देण्यात आली आहे. यापूर्वी प्रदीप चव्हाण यांच्याकडे युवा मोर्चातालुका उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती.या निवडी चे केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, आमदार हरिभाऊ बागडे, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, प्रभाकर पालोदकर, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष सुभाष शिरसाट, महाराष्ट्र प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पा काळे, जिल्हा कार्यकारणी सरचिटणीस ज्ञानेश्वर मोठे, सुनिल मिरकर, भारतीय जनता पार्टी सोयगाव तालुका अध्यक्ष बद्रीभाऊ राठोड, शिवाजी बुढाळ मा. जिल्हा परिषद सदस्य, उत्तम चव्हाण जिल्हा चिटणीस जयप्रकाश चव्हाण प्रदेश उपाध्यक्ष ( VJNT )भाजपा जिल्हाउपाध्यक्ष गणेश लोखंडे माजी सरपंच मोरसिंग चव्हाण नगराध्यक्ष कैलास काळे, माजी सरपंच वसंत बनकर, नगरसेवक आदींनी अभिनंदन केले.

# प्रसूतीपश्चात महिलेचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

भंडाराः प्रसुतीपश्चात बाळंतीण मृत्यू प्रकरणी सोमवारी जिल्हा सामान्य रूग्णालयात नातेवाईकांनी ठिय्या आंदोलन केले. डॉक्टरांच्या निष्कळजीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मध्यरात्रीपर्यंत आंदोलन सुरू होते. अखेर पोलीस प्रशासन व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दीपचंद सोयाम यांच्या मध्यस्थीमुळे नातेवाईकांनी मृतदेह रूग्णालयातून हलविले.

# लोणी तलाठी सज्जात अवकाळीने रब्बी पिकांचे केलेल्या नुकसानीचे पंचनामे

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लोणी शिवारात अवकाळी पावसाने केलेल्या नुकसानचे पंचनामे सुरू करण्यात आले आहे. तलाठी सजा लोणी तालूका खूलताबाद येथे दि.२६ते ३० नोव्हेंबर दरम्यान झालेल्या आवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असुण नूकसान झालेल्या पीकांचे पहाणी करून पंचनामे करण्यास सूरवात करण्यात आली आहे. एकही शेतकरी पंचनामेपासून वंचित राहनार नाही, अशी गव्ही लोणी सज्जाचे तलाठी उज्जवला वाघमारे मॅडम व लोणी चे ग्रामवीकास आधिकारि प्रशांत वाघमारे यांनी दिली आहे. यावेळी पंच म्हणून लोणी गावाचे माजी उप सरपंच सत्तार सूभान पटेल भाजपा अल्पसंख्याक तालूकध्यक्ष तथा लोणी गावाचे तंटामूक्त आध्यक्ष सत्तार शब्बीर पटेल माजी उपसरपंच बळीराम दांडेकर ग्राम, पंचायत सदस्य मोइन पटेल ग्राम पंचायत सदस्य संतोष दांडेकर, राहुल मोरे, जावेद बाबा पटेल यांचसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्र Business Katta












# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातील बौद्धिक प्रगल्भता



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**बोधिसत्त्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विद्वत्ताप्रचुर लेखन, त्यांच्या जीवनकार्याची खोली आणि व्याप्ती, त्यांची बौद्धिक प्रगल्भता आणि सामाजिक आणि राजकीय प्रश्नांचे त्यांचे वास्तववादी आकलन या सर्वांचे मूल्यमापन प्रतिबिंबित करणे, हा विषय खरे तर खूप मोठा ग्रंथ तयार करण्याचा आहे. त्यांचा विविध विषयांवरचा व्यासंग अफाट होता. त्यांनी अनेक विषयांवर मूलभूत चिंतन केलेले असून त्यातून अनेक अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथसंपदेची त्यांनी निर्मिती केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रंथ, प्रबंध, लेख, भाषणे, स्फुटलेख, पत्रे, वर्तमानपत्रे इत्यादी प्रकारात लेखन केलेले असून त्यांच्या लेखनाएवढे लेखन भारतातील इतर कोणत्याही राजकीय नेत्याने केलेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी प्रतिभावंत होते.**

ते मराठी, संस्कृत, पाली, इंग्रजी, हिंदी, फ्रेंच, जर्मन, गुजराती, बंगाली, कन्नड व पारसी या भाषा जाणणारे विद्वान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहुतांश लेखन हे इंग्रजीत आहे तर, काही मराठीत आणि बाकी इतर भाषेतील आहे. त्यांनी आपल्या लेखनातून धर्मसुधारणा व समाजसुधारणा याकडे प्रामुख्याने लक्ष दिलेले आढळून येते. जॉन ड्युई, एडविन सेलिगमन, फॅबियन आणि ब्रिटिश आदर्शवादी यांच्या विचारांचा आणि आदर्शांचा डॉ बाबासाहेब आंबेडकरांवर खूप प्रभाव होता.
ते उदारमतवादी आणि साम्यवाद्यांपासून मात्र अंतर ठेवून होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना लेखन करत असतांना विविध संकल्पनांचा विचार करण्याची गरज वाटली, एकतर त्यांचा पुरेसा शोध घेण्याची, त्यांच्या निरनिराळ्या निर्धारांचा उलगडा करण्याची किंवा त्यातील नावश्यक गोष्टी काढून त्यांना सुबोध करण्याची गरज वाटली.
ते कधी ऐतिहासिक घडामोडींच्या प्रकाशात तर कधी वादाच्या दृष्टिकोनातून मांडण्यासाठी त्यांनी वेगवेगळे दृष्टिकोन अवलंबिले. त्यांनी केलेले असे काही अभ्यास आहेत जिथे त्यांनी कालखंडाची योग्य टप्प्यांमध्ये विभागणी करून कालांतराने धोरण किंवामुद्द्यांमध्ये होणारे मोठे बदल शोधण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांच्या डॉक्टरेट अभ्यासासाठी आवश्यक माहिती जमावतांना कागदपत्रे आणि अभिलेखागारांचा आधार घ्यावा लागला, जे केवळ अधिकृत दस्तऐवजांमधूनच नव्हे तर अभिलेखीय माहितीवरून देखील शोधावे लागले होते. त्यांत हस्तलिखिते व ग्रंथ यांचे प्रमाण संदर्भ मुबलक प्रमाणात आढळतात. त्यांनी लिहिलेला ग्रंथ शूद्र पूर्वी कोण होते? हा एक संशोधनपूर्ण ग्रंथ आहे ज्यात शूद्रांच्या उत्पत्तीच्या इतिहासाचे विश्लेषण केले गेलेले आहे. पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य असे तीनच वर्ण होते. हिंदू समाजातील चौथा वर्ण शुद्र कसा व केव्हा उत्पन्न झाला हा आपला सिद्धांत सिद्ध करण्यासाठी आणि या संबंधित जगातील समाज शास्त्रज्ञांची जी मते आहेत ती खरी नाहीत हे स्पष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी अनेक उत्तम व सत्यसंदर्भ आपल्या ग्रंथासाठी वापरले आहेत.
डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादात विशेषतः १९५० च्या दशकात विलक्षण रस दाखवला. या कालखंडातील त्यांचे सर्व प्रमुख लेखन, म्हणजे भगवान बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्यभगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म आणि बुद्ध आणि कार्ल मार्क्स यात त्यांनी मार्क्सचा मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व म्हणून उल्लेख केला आहे. कार्ल मार्क्सशी सहमत असलेल्या काही महत्त्वाच्या नोंदींची ओळख त्यांनी करून दिली. अर्थात, तत्त्वज्ञानाचे प्रमुख कार्य म्हणजे जगाचा कायापालट करणे; वर्ग संघर्ष; मालमत्तेच्या खाजगी मालकीमुळे दुःख आणि शोषण होते; आणि उत्तम समाज व्यवस्थेसाठी खाजगी मालमत्तेचे एकत्रीकरण करणे आवश्यक आहे. या चारही मुद्द्यांवर भगवान बुद्ध मार्क्सशी सहमत असल्याचे त्यांना आढळले. समाजवादाची अपरिहार्यता, इतिहासाचे आर्थिक विवेचन, सर्वहारा वर्गाचे दारिद्र्य, सर्वहारा वर्गाची हुकूमशाही, राज्याची गळचेपी आणि सत्ता हस्तगत करण्याचे साधन म्हणून हिंसेची रणनीती मार्क्सच्या या विचारांना मात्र त्यांनी नाकारले. बाबासाहेबांच्या लेखनाचा बराचसा भाग हिंदू धर्मावर थेट परिणाम करणारा होता, प्रामुख्याने १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून त्यांनी केलेल्या या अभ्यासात बाबासाहेबांनी तर्क आणि नैतिकतेच्या आधारे समाज शोधण्याचा प्रयत्न करणारा बौद्ध धर्म आर्य समाजाच्या अधःपतनाविरुद्ध सामाजिक आणि वैचारिक अशा दोन्ही प्रकारची मोठी क्रांती आहे, असा युक्तिवाद केला. वर्णव्यवस्थेचा निषेध करून गरीब, शोषित आणि स्त्रियांच्या आशा पल्लवित केल्या. यज्ञ, पुरोहितगिरी आणि अंधश्रद्धेच्या विरोधात त्यांनी आक्रमकपणे लिखाण केले.
डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीआणि जातीव्यवस्थेविषयीचा अभ्यास करत असताना सती, बालविवाह, विधवा पुनर्विवाह बंदी यांसारख्या अनिष्ट गोष्टी जातीपातीचा परिणाम असल्याचे त्यांनी म्हटले होते. शिवाय एखाद्या जातीने आपल्या सीमा इतरांसाठी बंद केल्या, तर इतर जातींनाही त्याचे अनुकरण करण्यास भाग पाडले जात असे. ब्राह्मणांनी स्वतःला सामाजिकदृष्ट्या बंदिस्त करून प्रथम जातीव्यवस्थेला जन्म दिला. बाबासाहेबांनी अंतर्गत विवाह करण्याचे जातीपातीचे जे वैशिष्ट्य आहे ते अधोरेखित केले; परंतु श्रमविभागणी, आंतरभोजनाचा अभाव आणि जन्माचे तत्त्व यांसारख्या इतर वैशिष्ट्यांना एकत्रितपणे उल्लेख करून त्यांनी जातीचे वैशिष्ट्य ठळकपणे मांडले होते. जातीचे नाव हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, जे जातीव्यवस्थेच्या आदर्श सूत्रात विषमता टिकवून ठेवते, असेही त्यांना आढळले. श्रेणीबद्ध विषमतेमुळे जातीच्या सदस्यांपर्यंत समानतेची पोहोच अधिक मर्यादित होते. जात हे हिंदू धर्माच्या समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे, असे बाबासाहेबांना वाटत होते. राजकारण आणि संस्था प्रतिनिधित्वाच्या प्रश्नावर खोलवर परिणाम करतात, असे मत सायमन कमिशनसमोर त्यांनी मांडलेल्या सूचनेतून व्यक्त झालेले आढळून येते. ते असे की, प्रौढ मताधिकार लागू केल्यास ते वंचित वर्गासाठी आरक्षणासह संयुक्त मतदार संघाच्या बाजूने असतील आणि पूर्वीप्रमाणे मर्यादित मताधिकार कायम राहिल्यास ते स्वतंत्र मतदार संघाची मागणी करतील. एक संशोधक, अभ्यासू आणि चळवळीतील कार्यकर्ता म्हणून बाबासाहेबांचा अस्पृश्यतेशी असलेला संबंध जातीविषयीच्या दृष्टिकोनापेक्षा अधिक जिव्हाळ्याचा आहे. अशा प्रकारच्या संस्थेला कसे सहन केले गेले आणि त्याचा बचावही करण्यात आला, याचे त्यांना आश्चर्य वाटत असे. त्यांनी अस्पृश्यतेची संस्था जातीपेक्षा वेगळी असल्याचे स्पष्टपणे सांगितले होते, जरी अस्पृश्यतेला जाती संस्थेने बळ दिले असले तरी ब्राह्मणवाद हा दोघांचाही शत्रू बनला हे विशेष! बाबासाहेबांनी वेटिंग फॉर अ व्हिसा या मथळ्याखाली आपल्या जीवनात घडलेल्या घटनांपैकी काही आठवणी लिहिल्या असून बाबासाहेबांचे हे आत्मवृत्त कोलंबिया विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातील एक भाग झालेला आहे. बाबासाहेबांनी कामगार चळवळीतही सक्रिय योगदान दिले असून त्यांनी कामगार संघटनांमध्ये



औपचारिक पदेसुद्धा भूषविली आहेत. दोन दशकांहून अधिक काळ कामगारांच्या वस्तीत राहत असल्याने त्यांच्या समस्यांचे त्यांना सहज आकलन झाले होते. मात्र, भारतीय कामगारवर्ग जातीचा प्रश्न सोडवण्यासाठी कधीच पुढे आला नाही, असे त्यांना वाटत होते. याउलट औद्योगिक आस्थापनांमधील कामगारांची विभागणी ही जातीय संबंधांवर आधारित होती आणि जोपर्यंत कामगार वर्ग जातींमध्ये विभागला जाईल, तोपर्यंत त्यांचे वेतनवाढीसंबंधांचे लढे हे कुचकामी ठरतील, याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. राजकारण आणि धर्मासंदर्भात जसे बाबासाहेबांचे विचार स्पस्ट होते तसेच आर्थिक विचार आणि प्रश्नांच्या संदर्भात असलेला परस्परसंबंध दीर्घकाळ कायम होता. कोलंबिया विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी बाबासाहेबांनी एक प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला होता, याला प्राचीन भारतीय वाणिज्य असे नाव देण्यात आले होते आणि त्यात तीन आकर्षक अध्यायांचा समावेश होता, ते म्हणजे, मध्य पूर्वेशी भारताचे व्यावसायिक संबंध मध्ययुगातील भारताचे व्यापारी संबंध आणि क्राउन गव्हर्नमेंट आणि भारत अर्थव्यवस्थेच्या स्वरूपानुसार इतर देशांशी सखोल आणि वैविध्यपूर्ण संबंध असणारा देश म्हणून भारताला दाखवण्यात आले असून भारतातील कंपनी सरकारचे शोषक स्वरूप त्यांनी अतिशय स्पष्टपणे रेखाटले आहे. ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्त, तिचे उत्पन्नाचे स्त्रोत आणि १८५७ पर्यंतच्या खर्चाचा सुस्पष्ट लेखाजोखा डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला आहे. ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार आणि वित्त या संदर्भातील धोरणांच्या बदलाचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. हे बदल भारतीयांच्या हालअपेष्टांना कसे कारणीभूत ठरले, याचे विदारक आर्थिक स्थितीचे स्वरुप या प्रबंधात मांडण्याचे धाडस लाख मोलाचे आहे.
बाबासाहेबांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स (डी. एस. सी.) या पोस्ट डॉक्टरेट पदवीसाठी प्रा. एडविन कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली 'दि प्रॉब्लेम ऑफ दि रुपी – इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन' हा प्रबंध १९२२ साली सादर केला. या ग्रंथात त्यांनी भारतीय चलनाची उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा करून भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती? या त्या काळातील महत्वाच्या प्रश्नावर आपले मूलगामी विचार मांडले आहेत. या प्रबंधात बाबासाहेबांनी १८३५ मध्ये भारतात रुजवलेले चांदीचे मानक किंवा प्रोफेसर केन्स सारख्या अभ्यासकांनी सुचविलेल्या गोल्ड एक्स्चेंज स्टँडर्ड ऐवजी गोल्ड स्टँडर्डचे समर्थन केले आहे. भारतीय चलनाची आणि त्याच्या प्रश्नांची बाबासाहेबांनी केलेली सैद्धांतिक आणि व्यवहार्य मांडणी हीच पुढे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेसाठी निर्णायक ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ च्या पॅसिफिक रिलेशन्स कॉन्फरन्स साठी लिहिलेल्या अस्पृश्यांचे बंधविमोचन या शोधनिबंधात जातीचा मुद्दा जगासमोर आणला गेला आणि गुलामगिरी, वंशभेद, फॅसिझम यांसारख्या लांच्छनास्पद व मानवतेच्या अधःपतनाच्या इतर प्रकारांप्रमाणे याकडे तत्परतेने पाहिले जावे आणि गांधी आणि काँग्रेसच्या लेखी हा मुद्दा नगण्य, अंतर्गत बाब म्हणून पाहिले जात असले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये, अशी मागणी केली. औपचारिकता पूर्ण झाल्यावर हा शोधनिबंध १९४३ मध्ये ठाकर अँड कंपनीने सर्वसामान्यांसाठी पुस्तक म्हणून प्रकाशित केला.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १९४५ मध्ये प्रसिद्ध झालेला काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले? हा एक महान वैचारिक ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाच्या नावात 'काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्याचे किती नुकसान केले? असाच अर्थ निघतो. हा अर्थ सिद्ध करण्यासाठी या ग्रंथात विपुल माहिती व आकडेवारी दिली आहे. त्यांच्या आधाराने त्यांनी काँग्रेस आणि गांधी यांच्या राजकीय, सामाजिक धार्मिक व आर्थिक योजनासंबंधी चिकित्सक व टीकात्मक शैलीने प्रकाश टाकला आहे. याबरोबर चरिडल्स इन हिंदुइझम या ग्रंथात बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील अतार्किक बाबींवर प्रकाश टाकलेला असून त्यांनी राम व कृष्ण या देवतांवर केलेले विवेचन विवादास्पद ठरले होते.
दुसऱ्या महायुद्धाचा अनुभव पाहता बाबासाहेब राष्ट्रवादापासून सावध राहिले. त्यांना प्रामुख्याने न्यायावर आधारित आणि लोकशाही टिकवून ठेवणाऱ्या मानवी हक्कांच्या राजवटीची चिंता होती. १९४० मध्ये मुस्लीम लीगने वेगळ्या पाकिस्तानची मागणी केली तेव्हा त्यांना एकप्रकारे राष्ट्रवादाचा गांभीर्याने विचार करणे भाग पडले. राष्ट्रवादाच्या संदर्भात बाबासाहेबांना असे वाटत होते की, एकदा का मोठ्या संख्येने लोक आपणापाशी राष्ट्रीयत्व आहे असे मानायला लागले की, मग स्वतंत्र राष्ट्र म्हणून त्यांच्या असलेल्या अस्मितेला सामोरे जावे लागेल. यातूनच थॉट्स ऑन पाकिस्तान या ग्रंथाची निर्मिती झाली. या प्रवृत्तीला काँग्रेस आणि मुस्लीम लीग कारणीभूत असल्याचा ठपका त्यांनी ठेवला.
संविधानिक लोकशाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा प्रमुख विषय होता. जगातील लोकशाहीशी बांधिलकी असलेल्या विविध राज्यघटनांचा आणि त्यांच्या घटनात्मक विकासाचा अर्थ लावण्यात ते पारंगत होते. संविधान सभेच्या चर्चेत त्यांनी दिलेले विविध राज्यघटनांचे संदर्भ लक्षात घेतले तर हे स्पष्ट होते. १९२० च्या दशकाच्या मध्यापासून भारताच्या घटनात्मक घडामोडींमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा होता आणि समान नागरी कायद्यासारख्या काही मुद्द्यांवर त्यांना भारतातील चर्चेचा विषय ठरलेल्या काही प्रमुख मुद्द्यांचा अंदाज घ्यायचा होता. बाबासाहेबांनी भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशाच्या राज्यव्यवस्थेसाठी संविधानाची निर्मिती करून संविधानवादाची काही मूलभूत तत्त्वे विकसित केली; परंतु शेवटी त्यांची लवचिकता घटनात्मक नैतिकतेवर अवलंबून असेल, असा युक्तिवाद त्यांनी केला. बाबासाहेबांनी ज्या मुद्द्यांकडे बारकाईने लक्ष दिले, त्यातील एक मुद्दा म्हणजे सत्ता आणि प्रशासन. सत्ताधाऱ्यांनी वंचित वर्गास शोषणमुक्त करावे, यासाठी शासनाने सामाजिक-तार्किक वास्तवाचे शक्य तितक्या बारकाईने आपल्या कार्य पद्धतीत प्रतिबिंब उमटवले पाहिजे, असे त्यांचे मत होते. महापरिनिर्वाणदिनानिमित्त या महामानवास विनम्र अभिवादन! **(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी आणि फुले-शाहू-आंबेडकर व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्वप्ने कधी पूर्ण होणार ?



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**संपूर्ण जगाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाणारे अद्वितीय नाव, महान क्रांतिकारक, प्रखर राष्ट्र भक्त, कृतिशील समाजसुधारक, प्रज्ञावंत, ज्ञानाचे प्रतिक (दि सिंबल ऑफ नॉलेज), आधुनिक भारताचे अध्वर्यू , भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, नित्य स्मरणीय, अर्थतज्ञ, भारतरत्न, बोधिसत्व डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दिन! त्यानिमित्ताने डॉ.बाबासाहेबांच्या लढाऊ स्मृतींना कोटी कोटी वंदन! जगात अनेक महान विभूती जन्मापासून ते त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपले आयुष्य केवळ परोपकारासाठी झिजवतात. या महामानवांच्या देदीप्यमान रांगेत महाराष्ट्राचे भूमिपुत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर अग्रस्थानी आहेत.**

काही काही माणसांचे एक आयुष्य त्यांच्या कार्यासाठी अपुरे पडते असे त्या व्यक्तीला आणि त्यांच्या चाहत्यांनाही नेहमीच वाटत असते. ऐन उमेदीचा काळ, प्रगल्भता आणि आणखी लोकोपयोगी भरपूर कामे शिल्लक असतांना जीवन पटलावरून त्यांची झालेली एक्झिट ही सर्वांच्या काळजाला चटका लावून जाते! असे प्रचंड लोकप्रिय, लोकोद्धारक व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतात आणि अक्षरशः इथली लाखो हृदये क्षणभर थांबतात! भारतीयांचे आभाळ फाटले! आता काय करावे? आपले दुःख कुणाला सांगावे? कुणी कुणाचे सांत्वन करावे? कुणी कुणाच्या गळ्यात पडून रडावे? लोक सैरभैर झाले होते! त्यादिवशी जगाच्या इतिहासात एखाद्या व्यक्तीच्या अंत्य दर्शनाला येण्याची सगळी रेकॉर्ड तुटली! इथल्या उपेक्षित, वंचितांचा आवाज त्यांच्यापासून कायमचा पारखा झाला! आमचा तारणहार, माय-बाप काळाने आमच्यापासून हिरावून नेला! युवक, स्त्रिया,अबाल वृद्ध जमेल तसे अंत्यदर्शनासाठी गेले! अनेक जण गावातच रडत बसले, तर कित्येकांनी अन्न-पाणी सोडले! संपूर्ण देश शोकसागरात बुडाला असतांना जीवनाच्या अंतिम सत्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना गाठले होते!
शेवटपर्यंतचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवास मोठा खडतर होता. त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगावर एक एक ग्रंथ लिहिला जाईल एवढा मोठा संघर्ष आणि त्यातूनच त्यांच्याकडून विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य संपन्न झाले. आईंचे लवकर निधन झाले असले तरी सुभेदार रामजींनी आपल्या लेकरांना सन्मानाने जगण्याचे संस्कार केले. टापटीपपणा, अभ्यास, वाचन इत्यादी शिदोरी त्यांना बालवयातच लाभली. चिकित्सक युवक भिमराव मोठे चाणाक्ष आणि बुद्धिमान होते. याचा परिणाम म्हणजे ते शाळेत शिक्षकप्रिय विद्यार्थी बनले. गुरुजींनी विविध ग्रंथ देऊन त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण केली. एकानंतर एक यशाची शिखरे पादाक्रांत करत त्यांना परदेशी शिक्षणाची संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचे सोने केले. अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेऊन अर्थशास्त्र विषयात डॉक्टरेट करून ते डॉ.भिमराव आंबेडकर झाले. परदेशातून भारतात परतताच त्यांना जातीभेदाचे प्रचंड चटके सोसावे लागले. लहानपणी अजाण असलेले बाबासाहेब आत्ता सुज्ञ झाले होते. सुरुवातीला बडोदा संस्थानात नौकरी करण्याचा प्रयत्न केला, परंतु स्पृश्यास्पृश्यतेच्या झळांनी ते तिथे नौकरी करू शकले नाही. काही काळ वकिली केल्यानंतर त्यांना गावकुसाबाहेरील माणसांच्या व्यथा-वेदना स्वस्थ बसू देत नव्हत्या. त्याचवेळी त्यांनी कुठेही नौकरी करायची नाही, केवळ समाजातील वंचित, उपेक्षित लोकांचा आवाज बनायचे ठरवले. आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अखंड आयुष्यात स्वतंत्र भारताची मजबूत उभारणी करण्याच्या अनेक बाबी अधोरेखित केल्या. यामध्ये भारतीय राज्यघटना हे त्यांचे सर्वोच्च कार्य आहे. राज्यघटनेची बांधणी करतांना कश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतचा जाती, धर्म, पंथाचा भारत देश त्यांच्या समोर होता. इथला कोणताच माणूस कोणत्याही सोयी-सुविधांपासून उपेक्षित राहणार नाही याची तरतूद राज्यघटनेत करून भारताला एका अत्युच्च शिखरावर विराजमान केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर किती दूरदृष्टीचे होते? याचा प्रत्यय राज्यघटना वाचल्यावरच जाणवतो. असे असले तरी डॉ.आंबेडकरांनी आजच्या विकसित भारताची काही मूलगामी स्वप्ने पहिली होती. एखादा महापुरुष किती दृष्टा होता हे त्याच्या ग्रंथातील विचारावरून प्रत्यय येतो. डॉ.आंबेडकरांनी विकसित राष्ट्राची स्वप्ने पहिली होती. यामध्ये इथला तरुण उच्च शिक्षित, विवेकी, शीलवंत, गुणवंत, प्रज्ञावंत, मनाने व शरीराने मजबूत झाला पाहिजे असे स्वप्न पहिले होते आणि त्यासाठीच "शिका" हा महामंत्र दिला होता. शिक्षणच माणसाला सर्वांगीण विकसित आणि मजबूत बनवते अशी संपूर्ण खात्री त्यांना होती. त्याशिवाय "मी, संपूर्ण भारत बौद्धमय करीन!" ही एक महत्वपूर्ण प्रतिज्ञा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. दुर्दैवाने धर्मांतर केल्या नंतर त्यांना अल्पायुष्य लाभले. तेवढ्याच काळात त्यांनी इथल्या गावकुसाबाहेरील लोकांना आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा बुद्ध स्वतः स्वीकारून मुख्य प्रवाहात आणले. माणसामाणसात भेद करणारे सर्वच कर्मकांड, भेदभाव करणारे इथले धर्म नाकारले. देशातील वंचितांना कुणीतरी आपला विचार करणारा वाली आहे याची जाण झाली. त्यानंतर पुन्हा एकदा बुध्द धम्म वाढण्याची चळवळ देशभर उभी राहिली. याशिवाय "अनहीलेशन ऑफ कास्ट" (जातीअंत) हा निबंध लिहून देशातील तमाम लोकांना भेदभाव रहित जीवन जगण्यासाठी एका रेषेत आणण्याचे उपाय सुचवले. जातीजातीतील दरी संपविण्यासाठी आंतरजातीय विवाह हा उत्तम पर्याय त्यांनी सुचवला. अशी स्वावलंबी, मजबूत, एकी निर्माण करणारे अनेक स्वप्न डॉ.बाबासाहेबांनी पहिली होती. परंतु त्यांची ही सगळी स्वप्ने पूर्ण होण्याच्या अगोदरच त्यांनी जगाचा निरोप घेतला.
मग त्यांनी पाहिलेली स्वप्ने कोण पूर्ण करणार? हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे. खरंच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात आपण त्यांची स्वप्ने पूर्ण करणार आहोत का? आज जे स्वतःला त्यांचे कट्टर अनुयायी म्हणून सांगतात ते काय करत आहेत? बाबासाहेबांची चळवळ कुठं आहे? त्यांनी स्थापन केलेला राजकीय पक्ष कुठं आहे? त्यांनी स्थापन केलेल्या संस्था त्यांच्या तत्वावर मार्गक्रमण करत आहेत का? असे एक ना अनेक प्रश्न माझ्यासारख्याला आज त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी सतावत आहेत. त्यासाठी केवळ एखाद्या समूहावर विसंबून न राहता आज आपण सर्वानीच त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी झटावे लागणार आहे.
देशातील तरुणांनी काळाची पावले ओळखून कार्य करावे लागेल. आज देशाच्या तरुणाईला इंटरनेट, मिडियाचे ग्रहण लागले आहे. दिवसेंदिवस तरुणांच्या आत्महत्या वाढत आहेत. ही उद्याच्या समृद्ध भारतासाठी मोठी धोक्याची घंटा आहे.

# आदरांजली वाहण्या अगोदर वैचारिक व्हा..!



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे देश हिताचे व देशातील प्रत्येक माणवाच्या कल्याणाचे आहे. स्वतः चे लेकरांना मुठमाती देऊन करोडो लोकांच्या जिवनाला आनंदवन बनवणारे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर जगातील एकमेव व्यक्तीमत्व आहे. वर्ण प्रधान व जाती प्रधान देशामध्ये एकाच वर्णाला स्वतः च श्रेष्ठ मानुन इतरांना हीन माणण्याची अमानवीय रुढी परंपरा येथे होती. मानसा माणसात भेद करून माणसातील भेद कायम रहावा व या माणवी भेदामुळे एकाच वर्णाचा आर्थिक, धार्मिक व सामाजिक फायदा व्हावा आणि इतरांना धर्माच्या जातीच्या नावाखाली भावनिक बनवून माणसिक गुलाम बनवण्याचे काम या व्यवस्थेने केले. आणि लोकांना अज्ञानात ठेऊन अंधविश्वास, पाखंड व थोतांडाची निर्मिती करून माणसाच्या डोक्यात भिती निर्माण करून दहशत निर्माण केली.**

हजारो वर्षांपासून मानसिक गुलाम बनवून त्यांचे मानसिक, आर्थिक व सामाजिक शोषण केल्या गेले. विषमता, अंधविश्वास, पाखंड, आणि यावर उभी केलीली एका वर्णाची व्यवस्था उलथून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक जाती धर्मातील व्यक्तीला समान स्थान, मान सन्मान, हक्क अधिकार व मानवी स्वातंत्र्य बहाल केले. म्हणून खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील मानवाचे खरे उद्धारक ठरतात. वर्ण व्यवस्थेमधुन निर्माण झालेली जातीव्यवस्था आणि हि जातीची उतरंड रचुन एक जात दुसऱ्या जातीपेक्षा मोठी करण्याचा प्रयत्न करून जातीतील लोकांना हिन लेखणारी संस्कृती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी नष्ट करून सर्वांना एकाच रांगेत समान पातळीवर आणले व  जात, धर्म, पंथ, लिंग यानुसार कोणताही भेद केला जाणार नाही वा कोणतीही संधी नाकारली जाणार नाही अशी व्यवस्था निर्माण करून. हजारो वर्षांपासून शिक्षण, मानसिक स्वातंत्र्य व मुलभूत हक्कापासून दुर असलेल्या व्यक्तीला सरळ सत्तेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होऊन स्वतः चे अर्थात जनतेचे सरकार बनवण्याची ताकद दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे करोडो कुळांचा उद्धार झाला हे खरे आहे. पण आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे विचार करोडो घरात नाहीत हि खुप मोठी शोकांतिका आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणारे अर्थात सध्याचे बौद्ध लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी बापाचे नाते लावतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर या नावा बद्दल प्रचंड प्रेम, आपुलकी हि बौद्ध समाजामध्ये आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी वाटेल ते करण्याची हिम्मत ही बौद्ध समाजातील लोक दाखवतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाचा सर्वात जास्त सन्मान कोणी करत असेल तो बौद्ध समाज आहे यामध्ये कुठेही दुमत नाही. समता स्वातंत्र्य बंधुता व सामाजिक न्यायासाठी वैचारिक बौद्ध जाती धर्माचा विचार न करता न्यायाच्या बाजुने उभे राहतात यामध्ये ही शंका घेण्याचे कारण नाही. मराठा ओबीसी च्या वैचारिक जागृती साठी बौद्ध लोक तत्पर असतात हे अनेक उदाहरणावरून दिसून येते. परंतु मराठा ओबिसी ची बहुतांश लोक आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांच्या प्रती एकनिष्ठ नाहीत वा पाहिजे तसे भावनिक नाहीत, डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाला मराठा ओबीसी तसेच बहुजन समाजातील इतर लोक बौद्धांची वैयक्तिक संपती समजात. म्हणून आजही मराठा ओबीसी लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाला आजही समजून घेत नाही ही खंत आहे. परंतु मुळ प्रश्न हा आहे की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी नाते जोडणारे बौद्ध लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने वागतात का? ज्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बापाचा दर्जा दिला जातो त्या बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मराठा ओबीसी लोकांना समजून सांगितले जातात का? मराठा ओबीसी फुले शाहु आंबेडकर या विचार धारेमध्ये येत आहेत नाही असे नाही. परंतु बहुतांश लोक जे आजही आंबेडकरवादी चळवळी पासून दुर आहेत अशा लोकांना चळवळी मध्ये आणण्यासाठी बौद्धांनी काय केले याचीही समिक्षा करणे आवश्यक आहे. कारण केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर लिहून चालणार नाही, यांच्या वर बोलुन चालनार नाही तर आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची बाजु कोणत्या पद्धतीने मांडतो यावरही बरेच काही अवलंबून असते. बऱ्याच वेळा डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाची मांडणी करताना चुकीच्या पद्धतीने केली जाते. ज्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांचे कार्य प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपणच मर्यादित करतो. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करणे म्हणजे केवळ ठराविक दिवस फक्त हार घालणे, ठराविक दिवशी माईक घेऊन बोलणे, ठराविक दिवसाची सुपारी घेऊन पैसे कमवणे, ठराविक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन निव्वळ मनोरंजन करणे, गळ्यात निळा रुमाल वापरणे, घरावर निळा ध्वज फडकवणे म्हणजे अभिवादन मुळीच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना खरे अभिवादन, खरे वंदन तेव्हाच होईल जेव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजात पेरण्याचे काम करू. समाज म्हणजे बौद्ध धम्म नव्हे तर ज्या लोकांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे काम आहे त्यांच्या पर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान पोहचवणे वैचारिक व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी नाते सांगणाऱ्या लोकांचे काम आहे. परंतु मुख्य समस्या हिच आहे की डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी सर्वांसाठी काम केले, त्यांचे कार्य व विचार सांगण्या अगोदर आपण जे बोलतो.

त्यावरून च बाकीचे लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान ऐकत नाहीत.

जे लोक ऐकायला तयार नाहीत ते वाचणार कधी हा संशोधनाचा विषय आहे. बोलायला सुरवात करतो तेव्हा आपण बोलतो. दलीतांचे उद्धारक, आमच्या बापाने आमच्या साठी संविधान लिहले, हिंदु धर्माला लाथ मारली व बौद्ध धम्माची दिक्षा देऊन आम्हाला शांती व समता दिली, असे बोलुन जर सुरवात होत असेल तर फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन असते असे बोलले जाते तोच नियम येथे लागु होतो. दलित असंविधानीक शब्द वापरून डॉ बाबासाहेब आंबेडकर नेमके कोणाचे उद्धारक आहेत हे बोलणाऱ्यालाच कळत नाही, आमच्या बापाने आमच्या च साठी लिहले असे बोलल्याने मराठा ओबीसी कशाला ऐकणार? हिंदु धर्माला लाथ मारून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्म स्विकारला तर हिंदू लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर का समजून घ्यावे हा प्रश्न साहाजिकच असतो. थोडक्यात काय तर बोलतानाच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी चुकिच्या पद्धतीने केली जाते. महिलांचे उद्धारक, शेतकऱ्यांचे कैवारी, ओबिसी चे जनक, राष्ट्रनिर्माते, प्रत्येकाला मानसन्मान मिळवून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर अशा पद्धतीने जे सर्व सर्वसमावेशक काम होते तसे बोलायला सुरवात केली तरच लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर ऐकण्याची उत्सुकता लागेल, ऐकता ऐकता वाचायला व वाचता वाचता समजून घ्यायला लागतील. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर बोलताना लिहताना सत्य व सर्व समावेशक बोलावे लिहावे. सर्व समावेशक याचा अर्थ इतरांना चांगले वाटावे म्हणून सत्य लपवून ठेवणे मुळीच नाही. सत्य च बोला परंतु बौद्ध आणि असंविधानीक शब्द दलित यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अडकून ठेऊ नका. वा डॉ बाबासाहेब आंबेडकर मांडताना धर्म विरोधी मांडू नका. डॉ बाबासाहेब आंबेडकर धर्माच्या विरोधात नसुन ते धर्मातील अंधविश्वास, थोतांड, पाखंड, विषमता, अस्पृश्यता, अज्ञान, भोंदुगीरी अशा अमानवीय प्रथेविरोधात होते. हे ही समजून घेणे आवश्यक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन, अभिवादन करणे म्हणजे केवळ सहा डिसेंबर ला मुंबई, अशोक विजया दशमी ला नागपूर, भिम जयंती ला मिरवणुकीत, नामविस्तार दिनाला औरंगाबाद ला जाने व डॉ



बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर देखाव्या साठी नतमस्तक होणे असे मुळीच नव्हे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना खरे वंदन आणि अभिवादन तेव्हाच होते जेव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून त्यांच्या शिकवणुकी नुसार वागतो. आज आम्हाला समीक्षा करणे आवश्यक आहे. लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून सांगण्यापेक्षा, इतर लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना का मानत नाहीत हा प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा आम्ही थेट डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी नाते जोडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बाप मानतो. मग जर आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बाप मानतो तर बापाचे विचार स्विकारून आपण जिवन जगणे आवश्यक असे. जो बापाचे ऐकत नाही त्याला समाजात किंमत नसते याचीही जाणीव प्रत्येकाला आहे. मग डॉ बाबासाहेब आंबेडकर बाप असतील तर त्यांच्या विचाराने वागणे आमचे काम आहे. आम्ही आमच्या बापाच्या विचाराने वागतो का? याची समिक्षा कधी करायची? आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वैचारीक पातळीवर स्विकारले का यावर विचार विनीमय करणे आवश्यक आहे. समाजा साठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी व रमाई यांनी स्वतः च्या पोटची मुलं गमावली, डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्वात विद्वान होते, त्यांनीच आम्हाला माणसात आणले, आम्ही खातो त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे असे बोलून लोकांना भावनिक बनवून, टाळ्या व पैसे कमवू शकतो. पण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे व कार्याचे काय? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी चार मुल गमावली. पण बाबासाहेब गेल्यानंतर आम्ही समाजासाठी काय केले? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला माणसात आणले पण आज आम्ही माणूस म्हणुन जगतो का? बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला बोलण्याचा, लिहण्याची अधिकार दिला आम्ही सामाजिक वेदनेवर बोलतो का लिहतो का? आमच्या भाकरी वर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची सही आहे पण आम्ही भाकरी ला इमानदार आहोत का? या प्रश्नांची उत्तरे मिळवणे आवश्यक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या शिक्षणाचा व पैशाचा वापर आमच्या साठी च केला, वृत्तपत्र, शैक्षणिक संस्था, सुरू केल्या पण बाबासाहेब गेल्यानंतर आम्ही आमच्या शिक्षणाचा व पैशाचा वापर कशासाठी केला? याचाही हिशोब देणे महत्त्वाचे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर नतमस्तक होण्याआधी आम्हाला नतमस्तक होण्याच्या लायकीचे होणे आवश्यक आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सर्वात महत्त्वाचा संदेश. अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य समस्त मानव जातीला लागु होतात. एका जातीसाठी त्यांचे विचार व कार्य नाहीच परंतु आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेतो म्हणून आपल्याला अगोदर ते काटेकोर पणे पाळणे आवश्यक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश म्हणजे शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा. आज लोक शिकले, परंतु संघटीत झाले नाही आणि वैयक्तिक फायद्यासाठी संघर्ष सुरू केला. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची तोडफोड करून अनेकांनी सामाजिक संघटना व राजकीय पक्षाच्या माध्यमातून स्वतः ची दुकानदारी सुरू केली. स्वतः च स्वतः ला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मिरवून घेण्याची हौस जडली. हजारो राष्ट्रीय नेते तयार झाले पण एकही लोक प्रतिनिधी हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील, किंवा विचारधारेच्या पक्षातील नसेल तरी स्वतः च्या नावापुढे राष्ट्रीय अध्यक्ष लावताना थोडही काही वाटत नसेल तर आपल्या कडे नैतिकता आहे का? बाबासाहेब आंबेडकर यांनी संघटीत व्हायचे सांगितले आम्ही विघटित होऊन स्वतः ची दुकानदारी चालवत बसलो. समाजाचे काय? प्रत्येक जन स्वतः च स्वतः ला नेता समजतो, जनतेने तर नेता समजायला पाहिजे? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन दुकानदारी थाटण्यात नेमका काय मोठेपणा आहे? हजारो नेते तयार झाले तरी हक्काचा प्रतिनिधी नाही. सर्व जन एकत्र आले तर काही तरी हक्काचे उमेदवार निवडून येऊन चळवळीला बळकटी व समस्या सोडवायला मदत होईल. हा साधा विचारही डोक्यात येऊ नये का? बर यांच्या दुकानदारी ची जाहिरात नको त्या ठिकाणी करण्यात यांना मोठेपणा वाटतो. जसे नागपूर, मुंबई, औरंगाबाद अशा ठिकाणी सर्वसामान्य लोक केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे येतात. परंतु अशा ठिकाणी दुकानदार आपल्या दुकानाची जाहिरात करून दुकानदारी चालवण्याचा प्रयत्न करतात. तर कुठे तरी थांबायला पाहिजे जेथे लोक स्वतः हुन केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे एकत्र येतात तेथे तरी यांनी एका मंचावर येऊन सामाजिक कामासाठी आम्ही एकच आहोत असा संदेश द्यायला पाहिजे तर जागोजागी वेगवेगळे दुकाने थाटतात तेव्हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश पायदळी तुडवला जातो हे बघून मनाला त्रास होतो. सामाजिक ठिकाणी राजकीय व वैयक्तिक जाहिरात करणाऱ्यांना खरचं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्याचा अधिकार आहे का? हे जनतेकडून समजून घ्यावे म्हणजे कळेल. आता तरी शुद्धीवर येऊन आपण एकीकरण करावे. हीच आंबेडकरवादी जनतेची मनोमन ईच्छा आहे. दुसरी बाजू म्हणजे जो कर्मचारी, अधिकारी व व्यावसायिक वर्ग आहे त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मोलाचा संदेश दिला तो म्हणजे आपल्या उत्पन्नातील विसावा भाग अर्थात पाच टक्के रक्कम ही समाज हितासाठी खर्च करावी. बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी अस केले तस केले हे सांगण्या अगोदर नोकरदार व व्यावसायिक वर्गाने आपल्या उत्पन्नातील पाच टक्के वाटा हा कुठे खर्च केला याची ही समिक्षा करणे आवश्यक आहे. हा पैसा शिक्षण, आरोग्य रोजगार यावर खर्च होणे आवश्यक असते. परंतु आज पर्यंत कीती नोकरदार, पेशंनर यांनी एकत्र येऊन पाच टक्के रक्कम एकत्र करून शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर खर्च केला? जर हा खर्च झाला असेल तर त्या समुहाचेच खरे अभिवादन असेल. एकट्या बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वृत्तपत्र सुरू केले परंतु बाबासाहेब गेल्यानंतर आम्हाला वृत्तपत्र जगवता आले नाही याचे कारण आम्ही वृत्तपत्र जगवण्यासाठी पुढाकार घेतलाच नाही. जे वृत्तपत्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा व संविधानाचा सतत प्रचार आणि प्रसार करतात अशा वृत्तपत्रांना मदत करणे आवश्यक आहे. जे लेखक, कलाकार कोणतीही मानधनाची अपेक्षा न करता वर्षभर प्रबोधन सुरु ठेवतात त्यांच्या वर खर्च करणे आवश्यक असते. गोरगरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण, आरोग्य व रोजगार निर्मिती साठी पाचटक्के खर्च करणारा व्यक्तीच खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा खरा अनुयायी आहे. आणि त्यांनाच खऱ्या अर्थाने अभिवादन करण्याचा अधिकार आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने निव्वळ दुकानदारी करून, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राजकीय पोळी भाजत्यासाठी बेकी करून वागणाऱ्यांना डॉ बाबाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर नतमस्तक होऊन मी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करूच नये. कारण जनतेच्या अपेक्षा या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार सरणीच्या आहेत तर नेते आणि नोकरदार व व्यावसायिक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेच्या विरोधात वागताना दिसत आहेत. म्हणून जनतेच्या मनात सन्मान आणि आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा खरा अनुयायी होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करायचे असेल तर अगोदर वैचारिक होणे आवश्यक आहे. तरच बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर नतमस्तक होण्याची पात्रता आपल्या अंगी येईल व समाजात बदलाची निर्मिती होईल आणि हिच खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली असेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन..

# महिलांचे उद्धारकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी


**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्याअर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते.**

महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८  मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी  कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक  क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे.  दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले.  हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात  महिलांचा समावेश होता मग ते  १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# बेगडी प्रेम

आधुनिक केसरी

**मायबापे केवळ काशी ।तेणें न वजावे तीर्थासी ॥ १ ॥ पुंडलीकें काय केले ?। परब्रह्म उभे ठेले ॥ २ ॥ तैसा होई सावधान । हृदयीं धरी नारायण ॥ ३ तुका म्हणे मायबापे ।। अवघी देवाची स्वरूपे ।। ४ ।। आईवडील म्हणजे शुद्ध काशी होत. जो मनुष्य आईवडिलांच्या सहवासात असेल, त्यानं काशीची तीर्थयात्रा केल्यासारखं होतं. त्यानं तीर्थयात्रेला जाण्याची गरज नसते. अशा वेळी पुंडलिकानं काय केलं, ते ध्यानात घ्यावं. तो आईवडिलांची सेवा करणं थांबवून देवाकडे धावला नाही. त्यानं देवालाच उभं रहायला लावलं. तेव्हा, प्रत्येकानं पुंडलिकाप्रमाणे सावध रहावं.**





सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

ईश्वराला आपल्या हृदयात ठेवावं, पण त्याला प्राप्त करण्यासाठी आईवडिलांची सेवा करणं थांबवू नये. कारण, आईवडील म्हणजे पूर्णांशानं ईश्वराचं स्वरूप होत. तुकाराम महाराज आपल्याला सांगत आहेत, की आईवडिलांची सेवा हीच ईश्वराची पूजा होय. आईवडिलांच्या बाबतीत संत तुकाराम महाराज यांनी अतिशय साध्या सरळ व सोप्या भाषेत लोकांना बोधामृत पाजले आहे.

आईवडिलांची सेवा सोडून संत पुंडलिक हे विठ्ठला कडे धावून गेले नाहीत किंवा आपल्या भेटीसाठी,आपल्याला दर्शन देण्यासाठी सर्वसाक्षी परमेश्वर विठ्ठल आलेला असतांनाही पुंडलिकाने आपल्या सेवेत खंड पडू दिला नाही.

एकीकडे पुंडलिकांसारखे मातृदेवो भव, पितृ देवोभव मानणारे संत होऊन गेलेले असतांना आणि त्यांच्या मातृ पितृ भक्तीचे वर्णन तूकोबाराय सारख्या संतांनी केलेले असतांना समाजात अनेक प्रसंग असे बघायला मिळतात की अशा लोकांचं हसू यावं की त्यांच्यावर क्रोध व्यक्त करावा ते कळत नाही. माझं आयुष्य सूत्रसंचालन करण्यात चालले आहे. वडिलांपासून मिळालेला हा वारसा लोकसेवेचे व्रत समजून पार पाडतो आहे.त्यामुळे अनेकांच्या सुखदुःखाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माझ्याकडे



असते.कुणाकडील विवाह सोहळे, उद्‌घाटन सोहळे असोत की दुःखद प्रसंगी शोकसभेचे संचालन असो. ही जबाबदारी माझ्या खांद्यावर असतेच. समाज देखील मला एका ठिकाणी बसू देत नाही आणि मी देखील निस्वार्थपणे समाजाच्या हाकेला आढेवेढे न घेता साद देत असतो व स्वखर्चाने हजर राहत असतो. सुत्रसंचालनाच्या ह्या प्रवासावर मी स्वतंत्रपणे लिहणार आहेच.

आजचा विषय माझ्या मनाला वेदना देणारा आहे आणि माझ्या आयुष्यात अशी अनेक माणसे मी टिपली आहेत व अशा माणसांची किंमत माझ्या नजरेत शून्यच ठरली आहे.

सूत्रसंचालन,पत्रकारिता यामुळे अशा दुःखद प्रसंगाच्या वेळी मला हमखास बोलावल्या जाते. सिद्धेश्वर भाऊ,सकाळी तुम्ही लवकर या बरं.. सगळं तुमच्याकडेच आहेअन् हो खासदार साहेब,आमदार साहेब,अमुक तमूक ला देखील सांगा,यावच लागतं म्हणून तसे आम्ही तर निरोप पाठवलेच आहेत,आम्ही स्वतः पण बोललो तुम्ही पण बोला असा निरोप माझ्याजवळ दिल्या जातो. ज्या व्यक्तीची आई किंवा वडील मरण पावले आहेत, ती व्यक्ती, जेव्हा लोकप्रतिनिधी त्याच्याकडील दुःखद प्रसंगाला हजेरी लावतात तेव्हा त्यांच्या जवळ जाऊन हे महाशय लोकप्रतिनिधींच्या गळ्यात पडून रडतात. लोकप्रतिनिधी देखील त्या व्यक्तीला सावरण्याचा प्रयत्न करतात,सांत्वन करतात. आपल्याला जन्माला घालणारे आईवडील,त्यांच्या मृत्यूचे दुःख होणे,रडायला येणे साहजिकच आहे. किंवा त्यांचे आई वडीलांवर प्रेम नव्हते अशातला देखील भाग नसतो.परंतु आपल्या आईवडिलांचे ज्यांच्याशी ऋणानुबंध होते, त्यांच्याशी ज्या व्यक्तीच्या आठवणी जोडलेल्या आहेत, ती व्यक्ती समोर दिसताच त्या आठवणींना उजाळा येऊन रडायला येणे साहजिक आहे.परंतु ज्या लोकप्रतिनिधींनी कधीच ज्याच्या आईबाबाला बघितलेले नसते,कधी संबंध आला नाही, असे असतांना केवळ आपले आई वडिलांवर किती प्रेम होते आणि त्यांचा विरह किती दुःखद आहे हे दाखविणारे बेगडी प्रेम दाखविण्याचा प्रयत्न केल्या जातो.वास्तविक लाखोंचे नेतृत्व करणाऱ्या त्या त्या लोकप्रतिनिधी ला देखील हे कळत असते.

मृत्यूच्या सोहळ्याला इव्हेंट करणारी, बेगडी प्रेम असणारी हे बेगडी प्रेम व नाटकी दुःख उपस्थित असणारी माणसं देखील ओळखत असतात.

लोकप्रतिनिधी हे सारं काही जाणून असतात,परंतु त्यांना बोलून दाखवता येत नसते. आई वडिलांच्या आजारपणात कोणत्या मुलाने वा सुनेने सेवा केली व कुणी हाल केले हे देखील समाजाला ज्ञात असते. जो चारचौघात वावरतो ,भाषण करणारी पुढारी मंडळी त्याच्याच नावाचा सतत उल्लेख करत असतात,आणि शेतात दिवसभर मेहनत करून आल्यावर घरी आई वडिलांची सेवा करणारा मुलगा पुढाऱ्यांच्या दृष्टीआड होत असतो. परंतु कारण नसतांना मायबापांच्या मृत्यूचा देखील इव्हेंट करणाऱ्या मुलांबाबत तुकोबांच्या ह्या ओळीच तंतोतंत लागू होतात त्या म्हणजे...

तुका म्हणे ऐशा नरा,मोजूनी माराव्या पैजरा

# महापरिनिर्वाण बाबासाहेबांचे...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**६ डिसेंबर १९५६ रोजी ज्ञानाचे महासागर, परमपूज्य, बोधिसत्व, कायदे पंडित, थोर समाजसुधारक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले आणि शोषित, पीडित, वंचित बहुजन पोरके झाले. खरे तर बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण होणे समस्त भारतीयांसाठी फार मोठा आघात होता. बाबासाहेबांनी जे दुःख सोसले, ज्या वेदना त्यांनी भोगल्या ते दुःख,त्या वेदना बहुजनांच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून त्यांनी जीवनभर जे लढे लढले ते सगळे लढे भारतात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी होते.**

क्रांतीसूर्य महात्मा फुले यांनी भारतात सामाजिक सुधारणेचा पाया रचला होता.आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताची राज्यघटना लिहून समाजसुधारणेचा कळस गाठला.

बाबासाहेबांचा जीवनलढा,त्यांचे वाचन,त्यांचे पुस्तकांवरचे प्रेम, अद्वितीय असे समाजकार्य,त्यांचे आचारविचार,त्यांचे लेखन,त्यांचे चारित्र्य,त्यांचे वक्तृत्व अतिशय उच्च कोटीचे होते.तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना गुरू मानणारे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य अद्वितीय आणि भल्याभल्यांना तोंडात बोटे घालायला लावणारे होते.हे मात्र कोणालाही अगदी मनापासून मान्य करावे लागेल. घरातून मिळालेले संस्कार, पुस्तकांनी भरभरुन दिलेले ज्ञान आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिकलेले उच्च विद्याविभूषित असे शिक्षण याच्या जोरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतात केलेले सर्व क्षेत्रातील अद्वितीय असे कार्य अतिशय वाखाणण्याजोगे आहे.शिक्षणाच्या जोरावर माणूस किती महान होऊ शकतो याचे मुर्ती मंत उदाहरण म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. ज्या व्यवस्थेने बाबासाहेबांना वर्गात बसून शिक्षण शिकू दिले नाही,ज्या कर्मठ व्यवस्थेने त्यांना संस्कृत भाषा शिकू दिले नाही आणि उच्च विद्याविभूषित असूनही ज्या व्यवस्थेने बाबासाहेबांना नोकरी करताना पदोपदी अपमानित केले ती व्यवस्था मोडीत काढण्याचे कार्य त्यांनी केले.आणि 'ज्या धर्मात मी जन्माला आलो त्या धर्मात मी मरणार नाही' हे विधान त्यांनी लाखो अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्माचा स्वीकार करून सिध्द केले. भारतभुमित उदयाला आलेला मानवतावादी व विज्ञानवादी बौध्द धर्माचा स्वीकार करून आपल्यासह लाखो समाज बांधवांना जातीच्या उतरंडिच्या गर्तेतून बाहेर काढले.भारतात स्वातंत्र्य,समता,बंधुता,न्याय व मानवता ही मुल्ये रुजवण्यासाठी बाबासाहेबांना जीवनभर संघर्ष करावा लागला.त्यांनी अतिश्रमाने व अभ्यासपूर्ण असे भारतीय संविधान लिहिले पण ते लागू करण्यासाठी त्यांना अनंत अडचणी आल्या.प्रत्येकाचे समाधान होईपर्यंत संविधान व संविधानातील प्रत्येक कलम किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी पटवून दिले.त्यांची ही सगळी धडपड भारतात सामाजिक सुधारणा आणण्यासाठी होती हे कोणीच नाकारू शकत नाही. बाबासाहेबांनी लिहिलेले अनेक ग्रंथ विचारांची खाण आहेत.ते सगळे विचार सर्व सामान्य लोकांचे कल्याण करणारे आहेत. हिंदू कोड बिलाने भारतीय स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणले.ज्या समाजबांधवांना गावकुसाबाहेर ठेवले जायचे, जातीयतेच्या परंपरेने ज्यांचा अमानुष छळ केला जायचा आणि ज्यांचा गुलाम म्हणून उपयोग केला जात असे त्या समाजबांधवांना बाबासाहेबांनी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार बहाल केला. यातच बाबासाहेबांच्या कार्याचे मोठेपण दडले आहे.भारताच्या प्रत्येक नागरिकांसाठी,स्त्रियांसाठी, समाजासाठी व देशासाठी बाबासाहेब आणखी खूप काही करण्याची योजना आखून त्या दिशेने एकेक पाऊल टाकत होते.परंतु दुर्दैवाने काळाने घात केला.६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांची प्राणज्योत मालवली.बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले.सारा भारत दुःखसागरात बुडाला.एका महान विचारवंताला,एका थोर समाजसुधारकाला आणि नेहमी मानवतेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अहोरात्र झगडणाऱ्या महामानवाला आदरांजली वाहताना डोळ्यांतून आपोआप अश्रू ओघळतात!बाबासाहेबांचे विचार व त्यांनी दिलेली शिकवण आत्मसात करणे,त्यांनी दाखवलेला जीवनमार्ग अनुसरणे हीच खरी त्यांना आदरांजली...हीच खरी मानवंदना!

# बाबासाहेबांच्या ज्ञानातून परिवर्तन घडलं



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**ज्ञानाची वृद्धी वाढविण्यासाठी,व्यावहारिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या जाणिवांची माहिती होण्यासाठी प्रत्येकाला वर्तमानपत्राची पाने, इतर मासिके, नियतकालिके,कादंबरी, ग्रंथ तसेच विविध विषयावरील पुस्तकांची पाने वाचावी किंवा चाळावी लागत असतात.पुस्तक वाचनातून एखाद्याचं मत परिवर्तन होत असतं. शिवाय त्यातूनच सामाजिक परिवर्तनाची नांदी समाजामध्ये निर्माण होत असते.असेच परिवर्तन २५००० ग्रंथ वाचणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला कौतुक वाटणारं भारत देशात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व घडवून आणलं.**

बाबासाहेबांच्या ज्ञानातून खऱ्या अर्थाने माणसाला माणूस पण बहाल करणारं संविधान तयार झालं अन आपला भारत देश हा लोकशाही प्रधान देश उदयास आला.एक परिवर्तनीय अशी पहाट उजाडली.शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा,शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,जो पेईल तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही,असा संदेश बाबासाहेबांनी स्वतःच्या शिक्षणातून दाखवून दिला.एम.ए,पीएच.डी,डी. एस. सी.एल. एल. डी., डी लिट. बार अ‍ॅट लॉ या उच्च शिक्षणाच्या पदव्या बाबासाहेबांनी मिळविल्या.हे केवळ स्वतःसाठी नव्हते तर समाज व्यवस्थेला बदलून टाकण्यासाठी होते.

परिवर्तन हे शिकल्याशिवाय होऊच शकत नाही.याची जाणीव बाबसाहेबांनाच नव्हे तर त्यांचे वडील रामजी यांना सुद्धा होती. वाचनावर, पुस्तकावर प्रचंड प्रेम करणाऱ्या बाबासाहेबांनी दादर या ठिकाणी खास पुस्तकांसाठी राजगृह या वास्तूची निर्मिती केली. त्यामध्ये कायदा विषयावरील ५००० ग्रंथ, राजकारणावरील ३००० ग्रंथ, इतिहासावरील २५००० ग्रंथ, धर्मावर आधारित २००० ग्रंथ, तत्त्वज्ञान विषय ६०० ग्रंथ, युद्धशास्त्र ३००० ग्रंथ आणि इतर ग्रंथ असे ८०९०० इत्यादी ग्रंथ बाबासाहेबांनी वाचलेले आहेत.प्रत्येक महिन्याला ५०० रुपयांची पुस्तके खरेदी करणाऱ्या बाबासाहेबांना पंडित मदन मोहन मालवीय यांनी त्यावेळी ही सर्व ग्रंथ संपदा दोन लाखांना मागितली होती.परंतु ग्रंथसंपदेवर जीवापाड प्रेम करणाऱ्या बाबासाहेबांनी पुस्तके माझ्यासाठी माझा श्वास असल्याचे उत्तर दिले. १८ -१८ तास अभ्यास करणारे बाबासाहेब हे थोर होत.१८-१८ तास केलेल्या अभ्यासानेच शोषित पीडित वंचित घटकांना सोनेरी दिवस पाहायला मिळत आहे.भारतीय समाज व्यवस्थेतील विषमतेला मातीत गाडून समता प्रस्थापित करण्यासाठी बाबासाहेबांच्या शिक्षणाने सगळंच बदलून टाकलं.हजारो वर्षांची गुलामगिरी नष्ट केल्याने अंधकारमय जीवनाला प्रकाशित करण्याचं काम बाबासाहेबांच्या ज्ञानाने केले आहे.शिक्षणाने होणारे परिवर्तन त्यांनी दाखवून दिले.तसेच माणसाला माणुसकी प्राप्त करुन देण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून केले.हे परिवर्तन बुध्दीच्या जोराने शक्य झालं.रक्ताचा एकही थेंब न सांडता लोकांच्या जीवनात आमुलाग्र बदल,घडवून आणणे म्हणजेच लोकशाही होय.हेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला दाखवून दिले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर देशाबद्दल अभिमानाने म्हणतात की, मी प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीयच.आज देशातील सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्रित आणणारा हा महामानव खूप बुध्दिमान होता. समाजात समता निर्माण करण्यासाठी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश, पुणे येथील पर्वती मंदिर प्रवेश आदि क्रांतीकारी कार्य त्यांना करावे लागले.जातिव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारुन जातीयतेला नाकारुन समतेची माणुसकी लोकांमध्ये पेरण्याचे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.अन्यायाला प्रतिकार करीत न्याय मिळवून देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानले होते.महात्मा फुले शिकले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना सुद्धा शिकविले म्हणून तर स्त्री शिक्षणाचे,अस्पृश्य शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले. त्यातूनच समाज परिवर्तनाचे वारे वाहू लागले. ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपल्या आदर्शस्थानी मानले.त्याच बाबासाहेबांनी शिक्षणाला विशेष महत्व दिले. वास्तव परिस्थिती जाणून घेत असताना ते ज्ञान मिळवित गेले.जातीयतेचे चटके सहन करत असताना ज्ञानाने सर्व गोष्टी बाबासाहेबांना ज्ञात होत गेल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समाजासाठी लढणारे महान नेते होते. स्त्री हक्क अबाधित ठेवण्यासाठी हिंदू कोड बिल पास होत नव्हते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कायदे मंत्रीपदाचा राजीनाम ाही दिला होता.बाबासाहेब आंबेडकरांना जातीय चटक्याची जाणीव निर्माण झाली, तेव्हापासूनच ते सामाजिक न्यायासाठी आक्रमक झाले. तरुणपणात दलितांना न्याय मिळवून ! देण्यासाठी आणि उतारवयात ६ डिसेंबर या त्यांच्या महापरिनिर्वाण होण्याच्या अगोदर, शेवटच्या श्वासापर्यंत ते उपेक्षित समाजाचाच विचार करीत होते. गुलामगिरीच्या चिखलात रुतलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी ते सतत झटत राहिले.त्यांनी कधीही स्वतःच्या आरोग्याचा काळजी करणारा विषय समाजातील लोकांपुढे दिसून दिला नाही. मला माझ्या समाजासाठी काहीतरी करायचं आहे,या विचारांनी ते समाजासाठी झुंजत होते.शोषित पिडीत वंचित घटकांना न्याय मिळावा त्यांना समता मिळावी यासाठी ते कायम संघर्ष करत राहिले.हाच संघर्ष समाजाच्या जीवनात परिवर्तनीय, नवचेतना आणणारा ठरला.महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह, मनुस्मृती दहनांपासून ते नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा केलेला समतेचा सत्याग्रह,अस्पृश्य समाजांसाठी योग्य दिशा देणारा ठरला.१९३५ मध्ये येवले मुक्कामी जी धर्मांतराची घोषणा 'बाबासाहेबांनी केली होती. ती घोषणा त्यांनी त्यांच्या उतारवयात पूर्ण केली. २१ वर्ष सतत सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्या बाबासाहेबांना जगाला विश्व कल्याणाचा विचार देणारा, विज्ञान चिकित्सक पध्दतीचा असलेला भगवान गौतम बुध्दांचा बौध्द धम्म अधिक जवळचा वाटू लागला.ज्ञानाच्या कसोटीवर तोलून बाबासाहेबांनी हे भारत देशात मोठे परिवर्तन घडवून आणले.१४ ऑक्टोबर १९५६ मध्ये नागपूर या ठिकाणी भन्ते चंद्रमणी यांच्या हस्ते स्वतः बौध्द धम्माची दीक्षा घेत डॉ. आंबेडकर लाखो अनुयायांसह मानवता धर्माची उपासना करणाऱ्या बौध्द धम्मात गेले.नागपूर नंतर १६ डिसेंबर ला मुंबई आणि पुढे पुणे या ठिकाणी धम्मदीक्षा घेण्याचे ठरले होते.परंतु अवघ्या ५२ दिवसानंतर म्हणजे ६ डिसेंबर १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी झाले.धर्मांतरित झालेला समाज त्यावेळी पोरका झाला.परंतु जाता जाता जगाला आदर्शवादी ठरलेले संविधान या देशाला दिले. अज्ञानाच्या अंधकाराला दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी स्वतःचे ज्ञानातून जे परिवर्तनीय कार्य केलेले आहे.ते कदापि विसरता येणार नाही.बाबासाहेबांच्या ज्ञानाने नुसते परिवर्तनच झाले नाही तर हा भारत देश घडला आहे.इथे मानवतावादी दृष्टीकोन पेरला गेला. अशा ज्ञानाच्या महासागरास कोटी कोटी विनम्र अभिवादन....!

# सांगा पाटील काय करू; उपटा तूर अन् पेरा गहू..!

## अळयांनी केले तुरीचे पीक फस्त : बकऱ्या चारून फिरवला नांगर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** जगाचा पोशिंदा म्हणून संबोधल्या जाणारा शेतकरी या वर्षी खरीप हंगामापासूनच नैसर्गिक संकटात सापडला आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणारी खरीपाची पेरणी पावसाअभावी तब्बल जुलैच्या पहिल्या आठवड्यात सुरु झाली. त्यामूळे आपसुचकच तुरीच्या पेऱ्यात कमालीची वाढ झाली. अनुभवी शेतकऱ्यांच्या अंदाज सुद्धा रास्त ठरला होता.पण " आले निसर्गाच्या मना तिथे कुणाचे चालेना..!" अशी गत शेतकऱ्यांची झाली आहे. आचानक वातावरणात बदल झाला आणि ढगाळ वातावरणासोबतच अवकाळी पावसाने थैमान घातले. भुईसपाट झालेल्या तूर पिकावर मोठ्या प्रमाणात आळ्यांनी हल्लाबोल केला. परिणामी तुर पिकाच्या फक्त " तूराट्या " शिल्लक राहिल्या आहेत. त्यामूळे तालुक्यातील महागाव येथील शेतकरी गजानन धोंडुजी मवाळ यांनी तुरीच्या उभ्या पिकात गावातील बकऱ्या चारून नांगर फिरवला आहे. आता त्याशेतात ते गहू पेरण्याच्या मनस्थितीत आहेत. याबाबात त्यांना विचारले असता, जुन्या एका मराठी म्हणीचे थोडेसे विडंबन करून " सांगा पाटील काय करू; उपटा तूर अन्.. पेरा गहू..!" असे उपरोधिक उत्तर देत आहेत.

आजच्या आधुनिक युगात जग कितीही पुढे गेले असले, तरी सर्वांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी आवश्यक असलेले अन्नधान्य आणि भाजीपाला मात्र कुठल्याही कारखान्यात किंव्हा कंपनीत तयार होत नाही.ते फक्त शेतकरीच निर्माण करू शकतो. हे निर्विवाद सत्य आहे, पण त्यासाठी शेतकरयांना हवी तशी निसर्गाची सुद्धा साथ मिळाली पाहिजे हेही तेव्हढेच खरे आहे. मात्र या वर्षीच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या पाठीमागे साडेसाती लागली आहे. उशीरा झालेली पेरणी, त्यानंतर प्रदीर्घ काळ पावसाने दिलेली ताढण, अशा बिकट परिस्थितीमुळे खरीपातील उत्पादनात झालेली कमालीची घट आदी कारणामुळे पहिलेच शेतकरी हैराण झाले आहेत. त्यातच पुन्हा अवकाळीने थैमान घातले होते. परिणामी रब्बीच्या हंगामात सर्वात आधी हातात येणारे तुरीचे पीक उध्वस्त झाले आहे. ढगाळ वातावरणामुळे आळ्यांनी फुलांचा फडशा पाडला आहे.तर जेमतेम धरलेल्या शेंगा पक्व होण्याआधीच पोखरून टाकल्या आहेत. अशा अवस्थेत सदर पीक उभे ठेवून तरी काय उपयोग ? असा प्रश्न शेतकरयांना पडला आहे. या उद्विग्न अवस्थेतच महागाव येथील शेतकरी गजानन मवाळ यांनी उभ्या पिकात बकऱ्या चारून नांगर फिरवला आहे.



पंचनाम्यातही तूर उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय हाती आलेल्या माहितीनुसार आजमितीस अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे महसूल विभागामार्फत सुरू आहेत .पण जर एक हेक्टर क्षेत्रावर तुरीचे पीक असेल तर तिथे मात्र फक्त वीस गुंढेच नुकसान ग्राह्य धरले जात असल्याचे अनेक शेतकरी बोलत आहेत . शिवाय शेतकऱ्यांनी संबंधीत पंचनामे करणाऱ्या यंत्रणेला विचारणा केली असता," तूर हे पीक खरीपातील असून सदर पीक रब्बीतील नसल्याचे सांगण्यात येत आहे " अशी माहिती शेतकऱ्यांकडून मिळाली आहे . खरीपाची पेरणी उशीरा झाल्यामुळे यावर्षी जिल्हयात हजारो हेक्टर तुरीच्या क्षेत्रफळात वाढ झाली आहे . मात्र उपरोक्त प्रमाणात नुकसान ग्राह्य धरण्यात आले तर, हा तूर उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय असल्याचे संतप्त शेतकरी बोलत आहेत .



फुलांनी बहरून गेलेले तुरीचे पीक हाती लगावे म्हणून मी आजपर्यंत महागडे कीटक नाशक विकत आणून तीन ते चार फवारण्या केल्या आहेत . तरीसुध्दा आळ्यांनी पीक फस्त केले आहे .ना फुल, ना कळी, ना शेंग अशा अवस्थेत सदर पीक उभे ठेवून काय करू . . ? त्यातच नुकसाभरपाई पाच पट कमी मिळणार असेल तर जगायचे कसे . . ? त्यासाठी तूर उपटून गहू पेरला तर कमीतकमी कुटुंबाला भाकर तरी खायायला मिळेल . म्हणुन मी तुरीवर नांगर फिरवला आहे .

**गजानन धोंडूजी मवाळ, ( शेतकरी, महागाव ता .रिसोड )**

## मराठा बांधवांचा ८१ व्या दिवशी मराठा आरक्षणाच्या साखळी उपोषणात सहभाग

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी चालू असलेल्या साखळी उपोषणात आज दि.(५) डिसेंबर रोजी इंदिरा नगर भागातील सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा बांधवांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. गेल्या अनेक दिवसांपासून येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाण पत्र देऊन त्यांचा समावेश स्वतंत्र पणे ओबीसीमध्ये करण्यात यावा या मागणीसाठी इंदिरा नगर लोहा येथुल मराठा समाजातील बांधव साखळी उपोषण करत आहेत. आज उपोषणाचा ८१ वा दिवस आहे.

आज दि.(५) डिसेंबर रोजी लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या उत्साहात, मोठ्या संख्येने सहभागी होऊन जरांगे पाटील यांना व मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर हिरिरीने समोर येवून सरकारच्या निषेधार्थ मराठा समाजाच्या आरक्षणाच्या साखळी आंदोलनात सहभाग नोंदविला. यावेळीइंदिरा नगर येथील सकल मराठा बांधव अशोक पाटिल पवार, भीमराव पाटिल जाधव, अंबादास पाटिल पवार, राम पाटिल काळे, सचिन पवार, वसंत पवार, ब्रम्हानंद पवार, राजेश कुटे, माधव गायकवाड़, चंद्रकांत कंधारे, नवनाथ शिंदे, विठ्ठल टोणगे, कृष्णा पवार, दत्ता पवार, चंद्रकांत शिंदे, कृष्णा शिंदे गजानन टरके, बाळु कदम, दत्ता बुद्रुक, संग्राम पातळे, कचरु पौळ, कैलास सुर्यवंशी, ज्ञानेश्वर जाधव, विठ्ठल गायखर, वशिष्ठ आईनवाडिकर, राजेश चव्हाण, संभाजी चव्हाण लक्ष्मण तिडके आदींनी सहभाग नोंदवला.



## शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी शिक्षकसेना निर्णायक लढा देणार

### महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना जिल्हा नांदेड कार्यकारणीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दि. 3 डिसेंबर रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख माधव पावडे यांच्या संपर्क कार्यालय येथे शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली यावेळी शिक्षक सेनेचे जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, महिला प्रतिनिधी यांनी आपले मत मांडले प्रास्ताविक सचिव रवि बंडेवार यांनी जिल्हात शिक्षक सेनेच्या चांगल्या कामगिरीमुळे अनेक शिक्षक प्रवेश करत आहेत व गेल्या सहा महीण्याचा आढावा सांगितला तर जिल्हाध्यक्ष संतोष अंबूलगेकर यांनी या बैठकीत मागील काळातील शिक्षक सेनेच्या वतीने सोडवण्यात आलेल्या प्रश्नांवर प्रकाश टाकला शिक्षक सेनेने केलेल्या मागण्या आणि त्यांना मिळत आसलेले यश निच्छितच शिक्षक सेनेची भविष्य ऊज्वल याची नांदी आहे शिक्षकांच्या सोडवण्यात आलेल्या प्रश्नांची माहीती दिली तर अध्यक्षीय भाषणात राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाणयांनी प्रत्येक शिक्षकांच्या पाठीमागे निस्वार्थ तथा प्रामाणिक पणे शिक्षक सेना खंबीर पणे ऊभे आहे व प्रलंबीत शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी निर्णायक लढा देणार आधी कर्तव्य व नंतर हक्कासाठी लढणारी शिक्षक सेना आहे म्हणाले प्रशासनाकडून वारंवार आश्वासन दिले जाते पण प्रश्न प्रलंबित आहेत, असे का ?पुढील निर्णय काय घ्यायची याबाबत सर्वांनी मते खालील बाबीवर निर्णय घेण्यात आले. लवकरच शिक्षक सेनेचे तीव्र धरण आंदोलन करण्यात येणार यावे असे सर्वांच्या मते ठरले. खालील प्रश्न सोडवण्यासाठी.1) शिक्षण विस्तार अधिकारी पदे , केंद्रप्रमुख पदोन्नती, पदोन्नत मुख्याध्यापक , माध्यमिक शिक्षक इत्यादी पदे तात्काळ भरणे 2 )निवडश्रेणी वेतन श्रेणी देणे. 3 ) विषय शिक्षकांना वेतनश्रेणी देणे. 4 ) जिल्हा बदली होऊन आलेल्या शिक्षक बांधवांना एक आगाऊ वेतनवाढ मिळणे. 5 ) जीपीएफ हफ्ते जमा करणे. 6 ) वैद्यकीय बिले निधी अभावी प्रलंबित आहेत ते निकाली काढणे. 7 ) थकीत वेतन तात्काळ काढणे. 8 ) वैद्यकीय प्रतिपूर्ती बिले चे फाईल आरोग्य विभागात न पाठवणे याबाबत पत्र काढणे. 9 ) महागाई भत्ता थकीत रक्कम मिळणे . वरील सर्व प्रश्नांसाठी शिक्षक सेना आंदोलन करण्याचे ठरले तसेच *शिक्षण सहकारी पतसंस्थेकडून जी संचालक रद्द करणेबाबत ची नियमबाह्य नोटीस देण्यात आली आहे त्या नोटीसीबाबत जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे तीव्र धरणे आंदोलन करण्याचे ठरले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष मनोहर बंडेवार, जिल्हा कोषाध्यक्ष गंगाधर कदम, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश चिद्रावार व गंगाधर कदम, जिल्हा मार्गदर्शक शिवाजी पाटील, जिल्हा संघटक संजय मोरे, प्रकाश कांबळे, जिल्हा सहसचिव बालाजी लोहगावकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संतोष किसवे, लोहा. ता. अध्यक्ष संभाजी पवार नांदेडचे ता.अध्यक्ष प्रकाश फुलवरे, उपाध्यक्ष भागोजी पुठ्ठेवाड, किनवट तालुका सरचिटणीस दत्ता फोले, नायगाव तालुका पदाधिकारी लक्ष्मण ब्रम्हकर, महिला प्रतिनिधी शोभा गिरी मॅडम यावेळी उपस्थित होते.



## संभाजी ब्रिगेडचे एसटी डेपोस निवेदन प्रवाशांच्या जिवाशी खेळणे थांबवावे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशील गायकवाड**

**लोणंद :** एसटी बसेस चांगल्या अवस्थेत प्रवाशांना उपलब्ध करून देण्याबाबत संभाजी ब्रिगेडने पारगाव खंडाळा महामंडळ एसटी डेपो यांना निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,सातारा जिल्ह्यातील एसटी बसेस प्रवास करताना बंद अवस्थेत पडत आहेत. यामध्ये नागरिकांचे खूप हाल होत असतात.तसेच एसटी रात्री अपरात्री बंद पडत असतात.अशा घटना वारंवार घडत असताना दिसून येत आहे. यांचे दुरुस्तीकरण करणे वेळोवेळी गरजेचे आहे.काही ठिकाणी टायर पंचर झाल्यास स्टेफनी, दुसरा टायर उपलब्ध नसतो तर काही ठिकाणी जॅक नसतो तर काही ठिकाणी बसेस ना खिडक्या व्यवस्थित नसताना त्यांची गळतीही चालू असते. प्रशासनाने शिवशाही उपलब्ध करून दिली असताना सुद्धा तिकिटाचे दर भरमसाठ देऊनही नागरिकांना सुविधा मिळत नाहीत तरी आपण विशेष निर्णय घेऊन प्रवाशांच्या जीवाशी खेळणे थांबवावे. असे संभाजी ब्रिगेडच्या वतीने मागणी केलेली आहे. तसेच या कडे दुर्लक्ष केल्यास संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल. असा इशारा संभाजी ब्रिगेडचे संतोष मालुसरे, सुजित दगडे, शौकत शेख, शाहिद हुसेन, वसीम शेख, सचिन जाधव, दीपक बाटे यांच्याकडून देण्यात आलेला आहे.

## दिव्यांग चरणसिंह काकरवाल यांचा गुणगौरव

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील राजपूत /परदेशी समाजातील अष्टपैलू दिव्यांग व्यक्ती चरणसिंह काकरवाल यांच्या अष्टपैलू कामाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधत त्यांचा जागतिक दिव्यांगदिनी गौरव केला. चरणसिंह काकरवाल पायांने दिव्यांग असताना ते सर्वोत्कृष्ट जलतरणपटू आहेत,त्यांनी राज्य पातळीवरच्या अनेक जलतरण खेळात राज्य पातळीवरची बक्षीस पटकावलेली आहेत,ते उत्तम सायकलिस्ट सुद्धा आहेत त्यांनी सायकल स्पर्धात सुद्धा राज्य व विभाग पातळीवरचे पुरस्कार पटकावलेले आहेत,त्यांच्या या सन्मान प्रित्यर्थ माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, मुख्याधिकारी भागवत बिघोत, डॉ. दिनेश परदेशी, सायकलिस्ट योगेश गाढे,दिलीप अनर्थे,बाबासाहेब जगताप ,पारस राजपूत यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जागतिक मृदा दिनानिमित्त जाणून घेतले मातीचे महत्त्व

## जवळ्याच्या विद्यार्थ्यांचे जडले मातीशी नाते : मृदेसंबंधी जागरुकता निर्मितीचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्नसुरक्षेच्या दृष्टीने मृदेचं महत्व अन्यसाधारण असं आहे. अलिकडच्या काळात झपाट्याने वाढतच चालेले शहरीकरण, सिमेंटचे रस्ते यामुळे मृदेची अधिक प्रमाणात झीज होत आहे. त्याचबरोबर शेतीमध्ये वापरण्यात येणारी भरमसाठ रासायनिक खते, शहरीकरणासाठी आणि उद्योगधंद्यांसाठी करण्यात येणारी जंगलतोड आणि इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज होण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरु आहे. मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास आणि अशा प्रकारच्या इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे यासंदर्भात शेतकरी आणि सामान्य माणसांसह विद्यार्थ्यांमध्येही मृदेसंबंधी जागरुकता करण्याच्या उद्देशाने जवळा देशमुख येथे विद्यार्थ्यांचे 'जडले मातीशी नाते' हा कार्यक्रम घेण्यात आला. जागतिक मृदा दिनानिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मातीच्या विविध प्रकारांची माहिती देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, सहशिक्षक संतोष घटकार यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना अंबुलगेकर म्हणाले की, केवळ एक इंच सुपीक मृदेचा थर तयार होण्यासाठी ८०० ते १००० वर्षांचा कालावधी लागतो. मृदेचं संरक्षण म्हणजे संपूर्ण सजीवांचं संरक्षण. जगातील ९५ टक्के अन्नधान्य मृदेच्या माध्यमातून येतं. तसेच मृदेत पृथ्वीवरील एकूण सजीवांपैकी २५ टक्के सजीव आसरा घेतात. फळे, भाज्या आणि अन्नधान्याची गुणवत्ता ही मातीच्या गुणवत्तेवरुन ठरते. सध्या या मृदेच्या संवर्धनासमोर वातावरण बदलाचं मोठं आव्हान उभं आहे. माती हा एक जिवंत स्त्रोत आणि २५% पेक्षा जास्त ग्रहांचे जीवन आहे. आपले ९५% अन्न मातीमधून येते फळे, भाज्या आणि धान्य यांचे गुणवत्ता व प्रमाण मातीच्या आरोग्यावर अवलंबून आहे. पृथ्वीवरील जीवन टिकवण्यासाठी मातीचे जीव सतत कार्यरत असतात. माती हवामान बदल आणि ग्लोबल वार्मिंगशी लढायलाही मदत करते. शालेय अभ्यासक्रमातील पाठ्यघटकांशी सांगड



घालत विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मातीचे विविध प्रकार आणि वैशिष्ट्ये यांचा अभ्यास केला. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनीही विद्यार्थ्यांना माहिती दिली. ते म्हणाले, माती जीवनासाठी महत्त्वाची आहे. कारण ती अन्न, वस्त्र, निवारा आणि औषध यासह जीवनाच्या चार प्रमुख साधनांचा स्रोत आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आवश्यक आहे. माती जीवनासाठी अत्यावश्यक आहे. कारण ती अन्न, वस्त्र, निवारा आणि औषध यासह जीवनाच्या चार प्रमुख साधनांचा स्त्रोत आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आवश्यक आहे. याशिवाय माती वेगवेगळ्या प्रमाणात खनिजे, सेंद्रिय पदार्थ आणि हवा यांनी बनलेली असते. जीवनासाठी ते महत्त्वाचे आहे कारण ते वनस्पतींच्या वाढीसाठी एक माध्यम आहे. अनेक कीटक आणि इतर जीवांचे घर आहे. हे पृष्ठभागावरील पाण्यासाठी आणि वातावरणातील वायूंच्या देखभालीसाठी गाळण्याची प्रक्रिया प्रणाली म्हणून देखील कार्य करते. त्यामुळे मातीच्या नुकसानाबाबत अधिक जनजागृती करण्याची गरज आहे. मातीचे प्रदुषण थांबविण्यासाठी सगळ्यात आधी प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. पर्यावरणास अनुकूल, बागकाम, साफसफाईची आणि वैयक्तिक काळजीची उत्पादने निवडली पाहिजेत. बॅटरीसारख्या घातक कचऱ्याची जबाबदारीने विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. आपला अन्न कचरा कंपोस्ट करण्यात यावा. आपण वनस्पती-आधारित आहार घेतला पाहिजे. मातीची झीज रोखण्यासाठी जंगलतोडीवर बंदी वृक्ष लागवडीवर विशेष भर, उतार असलेल्या जमिनीवर बंधारे बांधून मातीची धूप रोखणे, बांधकाम आणि खाणकामात मातीची धूप होण्यापासून संरक्षण करण्यावर भर देणे, शेताची नांगरणी उताराच्या विरुद्ध करणे आदी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच माती पोषक तत्वांमध्ये मौल्यवान बनवण्यासाठी पीक रोटेशन तंत्राचा अवलंब वाढवण्याची गरज आहे, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

# वैजापुरात जागतिक दिव्यांग (अपंग) दिनानिमित्त दिव्यांगांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** जागतिक अपंग(दिव्यांग)दिनाचे औचित्य साधत येथील माजी शिक्षणाधिकारी व नगर पालिकेचे स्वच्छता दूत धोंडिरामसिंह राजपूत यांनी रविवार (ता.०३) रोजी देवीचे मंदिर परिसरात राहणारे दिव्यांग शंकर दगडू सोनवणे व बाळूभाऊ थोरात यांनां शाल पुष्पहार टाकून त्यांचा सन्मान केला. समाजाचा अविभाज्य घटक असलेल्या दिव्यांगाना सामाजाने सन्मानाची वागणूक द्यावी. ते दिव्यांग म्हणून त्यांची हेटाळणी टाळावी व शासनाने ही ह्या दिव्यांग व्यक्तींना त्यांना मिळणारे मानधन वाढवून द्यावे अशी शासनाकडे मागणी केली,शंकर दगडू सोनवणे दोन्ही पायांनी अधू आहेत ,ते लोहारकीचे सर्व काम हातानी करतात, त्यांना मुली व एक मुलगा आहे. दिव्यांग असूनही पांचही मुलींचे व मुलाचे लालन, पालन करून लग्न करून दिले. त्यांची पत्नी सौ. सत्यभामाने त्यांना पूर्ण सहकार्य केले. शंकर सोनवणे ७०वर्षे चे असून दोन्ही पायांनी अधू असून स्वतःची सर्व कामे स्वतः करतात. दुसरे दिव्यांग बाळूभाऊ असून ते दोन्ही डोळ्यांनी अधू आहेत श्री स्वामी समर्थ मंदिर समोर जे मिळेल त्यावर उदर निर्वाह करतात. त्यांचा सत्कार केल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणि आनंदाश्रु दिसून आले.





# पोलिसांनी व माणुसकी समूहाने दिला महिलेला मायेचा निवारा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एक महिला गेल्या एका वर्षांपासून विप्पन्न, बेवारस अवस्थेत महाराष्ट्र भर फिरत होती, सदरील महिला राणी सोमनाथ उबाळे वय ३० वर्ष राहणार पुलगाव ता. दौंड, जि. पुणे ही ओव्हर गाव हर्सूल पोलिस स्टेशन ,ता. छत्रपती संभाजीनगर येथे स्थानिक नागरिक देविदास एकनाथ तारे व इतर स्थानिक रहिवाशांना बेवारस स्थितीत मिळून आली, त्यांनी सदर महिलेला हर्सूल पोलिसांच्या स्वाधीन केले. सदरील महिलेस हर्सूल पोलिसांनी अस्थेने विचारपूस करुन सुलक्ष्मी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे माणूसकी वृद्ध सेवालयाशी संपर्क करुन तात्पुरत्या निवाऱ्यासाठी सदर महिलेस दाखल करुन घेण्याचे अवाहन हर्सूल पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक श्री प्रशांत पोद्दार यांनी केले.

त्यास प्रतिसाद देऊन सुलक्ष्मी बहुउद्देशिय संस्थेचे माणूसकी वृद्ध सेवालयाचे संचालिका सौ.पुजा सुमित पंडीत व श्री सुमित पंडीत यांनी अस्थेने चौकशी व विस्वासात घेऊन चौकशी केली असता तिचे पती आई वडील वारलेले असून सासरच्या लोकांची घरातून हकलून दिल्याचे सांगितले , ह्या महिलेची अवस्था इतकी वाईट होती की तिचे कपडे मळके होते, अंगाची दुर्गंधी येत होती, या महिलेस स्वतः पुजा पंडीत यांनी अंघोळ घातली व नविन कपडे घालायला दिले व सगळ्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन मायेचा निवारा सदर महिलेस उपलब्ध करुन दिला. या कार्यासाठी पोलीस निरीक्षक प्रशांत पोतदार साहेब पोलीस उप निरीक्षक दांगोडे सर, हर्सुल पोलीस स्टेशन कर्मचारी पो.हे.कॉ.देविदास गाडेकर,जयलाल राठोड, रविंद्र शिंदे,महिला पोलिस कर्मचारी अश्विनी गाडेकर, माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित,पुजा पंडित, रंजना प्रशांत ददें, प्रा.शरद सोनवणे, देविदास तारे,आदींनी मदतकार्य केले. दोन हात, दोन पाय एक डोक घेऊन जन्माला आल म्हणजे तो माणूस असे नाही तर ज्या माणसाजवळ मन, भावना व जनसेवेचा वसा व माणूसकी असेल तोच खरा माणूस असाच काहीसा अनुभव आम्हाला माणूसकी टीमच्या माध्यमातून अनुभवायला येत आहे. माणूसकी समूह हा काही गावांपूरता मर्यादित नसून सगळीकडे रस्त्यावर फिरणाऱ्या वेड्याबागळ्यांची सेवा करण्यासाठी माणूसकी वृध्दाश्रमाच्या माध्यमातून अनाथ भटक्यांची काळजी घेऊन औषधोपचार तसेच बेवारस आढळून येणाऱ्या मयताच्या अंत्यविधीसाठी माणूसकी समूहाची पोलीसांना फार मोठी मदत होत असते. माणूसकी समूहाबद्दल बोलायचे झाल्यास शब्द अपूर्ण पडतील असे या समूहाचे काम आहे असे मत हर्सूल पोलीस स्टेशनचे जेष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत पोद्दार यांनी व्यक्त केले.

# विंधणे (खालचा पाडा) रक्तदान शिबिरात ४७ रक्तदात्यांनी केले रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सामाजिक कार्यकर्ते तथा साईभक्त धनराज पाटील यांनी राज्यातील थॅलेसेमिया रुग्णांची रक्ताची अडचण दूर करण्याच्या उद्देशाने सामाजिक बांधिलकी म्हणून आयोजित केलेल्या रक्तदाब शिबिरात ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या शिबिराचे उदघाटन स्वराज्य संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष विनोद सदाशिव साबळे यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी ज्वालासिंह देशमुख स्वराज्य संघटना करंजाडे,अतिष साबळे ग्रामपंचायत सदस्य, कुणाल जाधव, नितीन ओंबळे, गणेश पोशा कोळी, भगवान म्हात्रे, विंधणे खालचा पाडा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णा कोळी, जयराम पाटील,केतन पाटील, विनोद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी आपल्या मनोगतातून बोलताना विनोद साबळे म्हणाले की, विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी विज्ञान रक्ताची निर्मिती अजून करू शकले नाही, त्यामुळे धनराज पाटील चा आदर्श घेऊन सर्व तरुणांनी रक्तदान करण्यास पुढे यावे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धनराज पाटील, निवास पाटील सुनिल वर्तक, सुनील पाटील,अमित पाटील,अनुज पाटील,यश पाटील, मिलिंद पाटील आणि धनराजच्या परिवाराने विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे दिवसभराचे निवेदन, सुप्रसिद्ध निवेदक सुनिल वर्तक, जीवन डाकी आणि दिपक पाटील यांनी केले.एकंदरीत सदर रक्तदान शिबीर मोठया उत्साहात, उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.



9130174444
हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# विवाहाचा खर्च टाळून अनाथाश्रमास मदत; भोसले कुटुंबीयांचा अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** गोंदेगाव, ता.निफाड येथील राजेंद्र पुंडलिक भोसले यांनी आपल्या कन्येच्या लग्नात अनावश्यक खर्च टाळून लासलगाव येथील अनाथ आश्रमास देणगी दिली असून त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत आहे.
लग्न म्हंटलं की, बँड, बाजा, बारात आलीच... शिवाय या सोबतच वऱ्हाडींसाठी मानाचे फेटे, टोपी, उपरणे, महिलांसाठी साडी आदी देव घेव करावी लागते. यातून रुसवे फुगवे झाल्याचे प्रकार नवे नाहीत. तरीही विवाहात काही कमी राहायला नको म्हणून टोपी, टॉवेल, फेटा देण्याची पद्धत अजूनही सुरूच असल्याचे दिसते. बरेचदा लग्नसमारंभानंतर हा फेटा रस्त्याच्या कडेला किंवा मंगल कार्यालयाच्या हिरवळीवर पडलेला आढळतो. त्यामुळे अपघात होण्याचे प्रसंग देखील झाले आहेत. हे चित्र बघता वधु पित्याने ही प्रथा मोडीत काढत त्याऐवजी अनाथ आश्रमास देणगी दिल्याचे प्रेरणादायक चित्र नुकतेच बघायला मिळाले. या उपक्रमाचे वऱ्हाडी मंडळींनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. त्यामुळे हा विवाहसोहळा चर्चेचा विषय झाला आहे. गोंदेगाव(ता.निफाड) येथील राजेंद्र पुंडलिक भोसले यांची कन्या भाग्यश्री व वारी (ता.कोपरगाव) येथील श्रीमती अर्चना संजय शिंदे यांचा सैन्यदलात कार्यरत मुलगा निखिल यांचा शुभविवाह नुकताच विंचूर येथे पार पडला. या विवाह सोहळ्यात महिलांसाठी साडी आणि पुरुषांसाठी टोपी आणि उपरणे न घेता त्या पैशांचा विनियोग अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांसाठी करावा अशी इच्छा निर्मला व राजेंद्र या भोसले दाम्पत्याची होती. अनेक लग्नसमारंभातून फेटे आणि टोप्यांवर होणारा हजारो रुपयांचा खर्च सत्कारणी लावण्यासाठी लासलगाव येथील जय बाबाजी अनाथ आश्रमाशी संपर्क केला व एकवीस हजार रुपये ह.भ.प. संगीता दिलीप गुंजाळ यांच्याकडे सुपूर्द केले. आश्रमातील अनाथ मुलांसाठी या रकमेचा विनियोग होणार असल्याने या उपक्रमाची उपस्थित वऱ्हाडी मंडळींनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.



फेट्यांना मान विवाह समारंभ पार पडपर्यंतच असतो. रस्त्याच्या कडेला पडलेला फेटा हा व्यर्थ खर्च झाल्याचेच सूचित करतो. त्यापेक्षा फेटे आणि साड्यांवर होणारा खर्च टाळून त्याऐवजी अनाथ आश्रमाला देणगी देण्याची भोसले दाम्पत्याची कृती गौरवास्पद आहे. यामुळे समाजात नवा पायंडा तयार होईल.
**– ह.भ.प.स्वामी वासुदेवानंद बहुरूपी महाराज.**
**(जय जनार्दन स्वामी अनाथ आश्रम, लासलगाव.)**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिकलशाचे पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** अखिल भारतीय बौद्धधम्म ज्ञानसागर प्रसारक मंडळ या संस्थेच्या वतीने व खुलताबाद तालुक्यातील बौद्ध उपासक-उपासिकांच्या वतीने बुद्धभूमी मावसाळा येथे मागील 23 वर्षापासून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते तसेच "अखिल भारतीय बौद्ध भिक्षू संघाचे प्रचारमंत्री " व महू येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष पूज्य भदंत प्रा. सुमेधबोधीजी (महास्थवीर) यांनी कायम स्वरुपी 2014 सालापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थीकलश बुद्धभूमी मावसाळा येथील बुद्ध विहारामध्ये कायमस्वरूपी दान दिले असल्या कारणाने प्रत्येक वर्षी अस्थिकलशाला अभिवादन करण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यासह औरंगाबाद शहरातून व संपूर्ण महाराष्ट्रातून बौद्ध जनसमुदाय मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहतो या वेळी भदंत डॉ.प्रा.एम. सत्यपाल (महाथेरो), भदंत हर्षबोधी (थेरो), भदंत धम्मज्योती (थेरो), भदंत सारिपुत्त (गुजरात) ,अमृतानंदबोधी, पूज्य भदंत प्रज्ञाकीर्ती, भदंत करुणाबोधी भदंत राजरत्न (जालना), भदंत मंगलबोधी, भंते आत्तदीप भंते मंगलबोधी भंते विशुद्ध ज्योती आदि भिक्षुसंघ या वेळी उपस्थिती राहून धम्मदेशना ,मार्गदर्शन, प्रवचन देणार आहे . महत्त्वाचे म्हणजे जपान येथील धर्मगुरू कोटानोगोची ( जपान ) यांची सुद्धा या ठिकाणी मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच अनेक मान्यवर, बौद्ध अभ्यासक उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

## मनपाद्वारे स्वच्छ शौचालय मोहिमेस प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेद्वारे स्वच्छ शौचालय मोहीमेस सुरवात करण्यात आली असुन याअंतर्गत महिला बचतगटांद्वारे संजय गांधी कॉम्प्लेक्स, बस स्थानक परिसर व बागला चौक परिसरातील मनपा शौचालयांमध्ये ३ डिसेंबर रोजी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार १९ नोव्हेंबर या जागतिक शौचालय दिवसापासून अभियानाला प्रारंभ झाला असून २५ डिसेंबर या सुशासन दिनापर्यंत अभियानाच कालावधी असणार आहे. या पाच आठवड्यांच्या कालावधीत सर्व शौचालयांमध्ये स्वच्छता व देखभाल विशेष मोहीम राबवली जाणार असून शौचालयांमध्ये FACES अर्थात FUNCTIONAL, ACCESSIBILITY, CLEAN, ECO-FRIENDLY आणि SAFE अशाप्रकारे 'कार्यान्वित, प्रवेशयोग्य, स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित' अशा बाबींनुसार शौचालय तपासणी करण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत महिला बचत गटांद्वारे शौचालयांची तपासणी करण्यात येणार असून त्याची वर्गवारी केली जाणार आहे. या माध्यमातून महिला बचत गटांचे सक्षमीकरणही केले जाणार आहे. यासाठी महिला बचत गटांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना रितसर प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिला बचत गटांचे हे तपासणी समूह शौचालयांना भेटी देऊन त्यांची प्रत्यक्ष पाहणी करत दिलेल्या निकषानुसार त्यांचे मूल्यांकन करून शौचालयांना श्रेणी देतील.

याप्रमाणेच 'स्वच्छ शौचालय चॅलेंज' जाहीर करण्यात आले असून ५ डिसेंबर ते १५ डिसेंबर हा या अभियानाचा कालावधी आहे. या अंतर्गत स्वच्छ शौचालयांना 'स्वच्छ भारत सार्वजनिक शौचालय' असा गुणवत्तेचा दर्जात्मक शिक्का प्राप्त होणार आहे. चंद्रपूर शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाची शौचालये उपलब्ध करून देण्याचा चंद्रपूर महानगरपालिकेला प्रयत्न असुन मनपाची सर्व शौचालये गुगल मॅप वर सहजपणे उपलब्ध आहेत व नागरिकांच्या वापरासाठी त्यांचा गुणात्मक दर्जा कायम राहील याच्याकडेही लक्ष दिले जात आहे.





## सासवड येथील सोपानदेव हॉस्पिटलच्या वतीने ३५ पत्रकारांची मोफत तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**नीरा :** महाराष्ट्रातील पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेचा रविवारी ८५ वा वर्धापनदिन. या निमित्ताने रविवार दि. ३ डिसेंबर रोजी राज्यभरात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी करण्यात आली. पुरंदर तालुक्यातील पत्रकारांची देखील रविवारी सासवड येथील संत सोपानदेव हॉस्पिटलमध्ये आरोग्य तपासणी करण्यात आली. तालुक्यातील ३५ पत्रकारांची आरोग्य तपासणी यावेळी करण्यात आली.
सासवड येथील संत सोपानदेव हॉस्पिटलचे डॉ. संदीप होले आणि डॉ.अविनाश बालगीर यांनी ही आरोग्य तपासणी मोफत केली. यावेळी भाजपचे पुरंदर हवेली मतदार संघाचे अध्यक्ष बाबाराजे जाधवराव, पश्चिम विभाग प्रमुख जालिंदर कामठे, जेजुरीच्या अल्काताई शिंदे, पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अधक्ष सुनील लोणकर, मराठी पत्रकार परिषदेचे सहप्रसिद्धी प्रमुख भरत निगडे, पुणे जिल्हा सोशल मीडिया उपाध्यक्ष राहुल शिंदे, पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कामथे, संस्थापक अध्यक्ष दत्ता भोंगळे, सचिव अमोल बनकर, कोषाध्यक्ष निलेश भुजबळ, जिल्हा प्रतिनिधी बी.एम. काळे, प्रकाश फाळके, सह सचिव मंगेश गायकवाड, पुणे जिल्हा महिला प्रतिनिधी श्रावणी कामत यांच्यासह बहुसंख्येने पत्रकार उपस्थित होते.

# तुम्ही एसबीआयचे थकबाकीदार आहात? मग या संधीचा लाभ घ्या

## तीस ते सत्तर टक्के रक्कम होणार माफ

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** देशातील सर्वात मोठी राष्ट्रीयकृत बँक असलेल्या एसबीआय बँकेच्या धर्माबाद शाखेने राष्ट्रीय ९ डिसेंबर रोजी लोक अदालतीचे आयोजन धर्माबादच्या दिवाणी व फौजदारी न्यायालयामध्ये आयोजित करण्यात आल्याची माहिती एसबीआयचे मॅनेजर बद्रीनाथ चाटे यांनी दिली आहे.
लघु उद्योजक असो की, मोठा व्यावसायिक अथवा शेताकरी यांचे क्रॉप लोन, स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी धडपडणारे युवक - युवती असो तो भाग भांडवल उभे करण्यासाठी बँकेची मदत घेत असतात मात्र वेगवेगळ्या कारणासत्व बँकेचे कर्ज थक्कीत राहून जाते.यामुळे विश्वासहर्ता धोक्यात येते.
नवे काही करायचे असते पण भांडवल नसते, बँक जुन्या कर्जामुळे नवे कर्ज देत नाही. अशा लोकांसाठी बँकेने वर्षानुवर्षे प्रलंबित राहणारे खटले, आर्थिक चणचण, वेळेचा अपव्यय या सर्व गोष्टी टाळणे, आपापसांत सामोपचाराने तडजोड घडवून वाद मिटविण्याकरिता लोकअदालतींचे आयोजन केले आहे.

बँकेचे व ग्राहकांचे विश्वासाचे नाते कायम राहावे यासाठी बँकेने ९ डिसेंबर रोजी लोक अदालतीचे आयोजन केले आहे. या लोक अदालतीत तडजोड केल्यास मानसिक ग्रहकांची त्रासातून सुटका होते; तसेच पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचतो. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी लोकअदालतीत दावे तडजोडीस प्राधान्य द्यावे. या सुविधेचा लाभ घ्यावा तसेच शेतकरी यांचे क्रॉप लोन हे पुन्हा रिन्यूअल करून कर्ज वितरित करण्यात येईल.



**– बद्रीनाथ चाटे, शाखाव्यवस्थापक स्टेट बँक ऑफ इंडिया, धर्माबाद.**

इतकेच नसून बँकेने तीस ते सत्तर टक्के रक्कम माफ करण्याची बंपर ऑफर ही दिली आहे. मात्र ही योजना सरसकट नसून यांचे काही निकष आहेत.
त्यामुळे आपले नेमके किती टक्के कर्ज माफ होणार आहे.? याची माहिती जाणून घेण्यासाठी धर्माबाद स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखाव्यवस्थापक बद्रीनाथ चाटे यांच्याशी संपर्क साधून आपल्या थकबाकी संदर्भात संपूर्ण माहिती घ्यावी असे आव्हान त्यांनी केले आहे.






# कॉँग्रेसच्या विजयाचा भोकरमध्ये जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सीमेलगत असलेल्या तेलंगणातील कॉँग्रेसचा दणदणीत विजयाचा शहरात सोमवारी ता. (चार)कॉँग्रेसच्या कार्यकत्यांनी ढोल ताषाच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला. तेलंगणा विधानसभा निवडणूकीत कॉँग्रेस पक्षाकडून विशेष निरीक्षक म्हणून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याकडे जबाबदारी होती. त्यांनी नियोजनबद्धरित्या प्रचारयंत्रणा राबविल्याने तेलंगणात कॉँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले. तेलंगणातील कॉँग्रेस पक्षाच्या विजयाचा सोमवारी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात कॉँग्रेसच्या कार्यत्यांनी ढोलताशाच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष भगवान दंडवे, सभापती जगदीश पाटील, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर, माजी पं.सं सभापती गोविंद पाटील गौड, उपसभापती बालाजी शानमवाड, मिर्झा ताहेर बेग, डॉ. मनोज गिमेकर, डॉ. फिरोज इनामदार, जवाजोदीन बालाजी पांचाळ, संजय बरकमकर, विकास क्षिरसागर, सुरेश कावळे, विठ्ठल माचनवार, आदिनाथ चिंताकुटे, सुरेखा माळे, अनिता साबळे, कमल गाजुलवार आदिंसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## पीकविमा कंपनीच्या कार्यालयात शिवसेनेचा राडा

### संतप्त शिवसैनिकांची तोडफोड, कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** तीन राज्यातील निवडणूक निकालाचा आनंद एकीकडे साजरा होत असतानाच आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक होत चंद्रपूरातील उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष संदिप गिर्हे आणि त्यांच्या शिवसैनिकांनी आज ओरीऐंटल इन्शुरन्स कंपनी च्या कार्यालयावर धडक देत शेतकऱ्यांच्या बाजूने आक्रमक पवित्रा घेतला.

चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी व पूरामुळे सोयाबीन व कापूस या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पिकविमा काढल्याने ओरीऐंटल इन्शुरन्स कंपनीला पिकांच्या नुकसानीपोटी जिल्ह्यातील ४७ हजार शेतकऱ्यांना २४ कोटी रूपये वितरीत करणे आवश्यक होते. मात्र, कंपनीने केवळ ११ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर केवळ ५ कोटी रूपये वितरीत केल्याने संतप्त झालेल्या शिवसैनिकांनी कंपनीचे कार्यालय गाठत कार्यालयातील खुर्च्या, संगणक, प्रिंटर, टेबल यांची तोडफोड केली. कंपनीतील कर्मचाऱ्यांशी धक्काबुकीही करण्याचा प्रयत्न यावेळी केला. जिल्हाध्यक्ष संदिप गिऱ्हे यांनी जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यातील शेतकऱ्यांना किती मदत केली याची माहीती संबंधित अधिकाऱ्याला मागितली. परंतू ती माहीती देण्यास टाळाटाळ करत उडवाउडवीचे उत्तर देण्यात आले. त्यामुळेच संदिप गिऱ्हे व शिवसैनिक यांनी आक्रमक भुमिका घेत आपल्या स्टाईल ने हे आंदोलन केले. आतातरी योग्य माहीती मिळेल व शेतकऱ्यांना पिकविमा कंपनी कडून योग्य तो अपेक्षीत मोबदला मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी आमचे प्रतिनिधी शाम हेडाऊ यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता मि मिटींग मधे आहे नंतर संपर्क करतो असे सांगून प्रतिक्रिया देणे टाळले.





## देऊर येथे प्रथमच भव्य दिव्य ऐतिहासिक शिव महापुराण सोहळा

### श्री. बाळासाहेब भदाणे यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** दि.२९ नोव्हेंबरपासून कालावधीत ह.भ.प. प्रकाशजी महाराज शास्त्री (वृंदावन) यांच्या मधुर वाणीतून संपन्न होत आहे. समस्त शिव महापुराण सेवा समिती देऊर बू यांच्या यशस्वी आयोजनातून भव्य दिव्य स्वरूपाचा हा कार्यक्रम भाविक भक्तांसाठी सुरु आहे. सोमवारी रात्री कथेच्या सुरवातीला बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते आरती करून कथेला सुरुवात झाली. यावेळी अध्यात्माच भारावून जाणारं वातावरण होतं. आपल्या भारत देशानं जगाला एक अमूल्य भेट दिलीय. ती म्हणजे अध्यात्म. अध्यात्मानं जगाला दिशा दाखवली आहे. शिव पुराण ऐकलं तरी मन प्रसन्न होतं, नवी ऊर्जा संचारते, प्रेरणा मिळते. हीच प्रेरणा पुढे जनहितासाठी उपयोगी ठरते असे मत बाळासाहेब भदाणे यांनी व्यक्त केले.यावेळी कथेस समस्त भाविक शिवभक्त, देऊरचे लोकनियुक्त संरपंच, भाऊसाहेब देवरे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिति अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर